।। कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।।

रजि.क्र. एफ्४०२० स्थापना १९३७

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड




## वार्षिक अहवाल
## २०२२-२३

Email : mss_mulund@rediffmail.com
Web Site : www.mahasevasangh.org



सु.ल.गद्रे कलाकार पुरस्कार प्रदान सोहळा



सु.ल.गद्रे साहित्यिक पुरस्कार प्रदान सोहळा



संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार उद्घाटन



सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार प्रदान सोहळा




कला विभाग - पाऊस,कविता, गाणी आणि भजी




सा.स. न.चिं. केळकर ग्रंथालय 'आग्ऱ्याहून सुटका ते राज्याभिषेक सोहळा'



मैत्रेयी - हम साथ साथ है।

।।श्री।।

अध्यक्षांचे मनोगत,

*महाराष्ट्र सेवा संघाचे कार्यक्षम, तरुण आणि सर्वांना प्रिय असलेले कार्यकर्ते श्री.चंद्रशेखर कुलकर्णी ऑगस्ट २०२० मध्ये अध्यक्ष झाले. परंतु मार्च २०२० मध्ये करोना महामारीमुळे त्यांना खूप काम करण्याची संधी मिळाली नाही. दुर्दैवाने त्यांचे नोव्हेंबर २०२१ मध्ये आकस्मिक निधन झाले. नंतर ही धुरा तत्कालीन उपाध्यक्ष श्री विनोद सौदागर यांनी सांभाळली. मात्र करोनाचा प्रभाव पूर्णपणे गेला नसल्याने त्यांच्यावरही परिस्थितीच्या मर्यादा होत्या.*

*ऑगस्ट २०२२ मध्ये म्हणजे या अहवाल वर्षात मला पुन्हा अध्यक्षपद मिळाले. त्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी तीन अग्रक्रम निश्चित केले होते, एक म्हणजे संस्थेचा आर्थिक पाया सुदृढ करणे आणि तरूण कार्यकर्त्यांचा अधिकाधिक समावेश करणे, कार्यक्रमांची उपस्थिती वाढवणे. सध्या हळूहळू परिस्थिती सुधारत असली तरी संस्थेच्या मुदत ठेवींसमोर कर्जाऊ पैसे (ओव्हरड्राफ्ट) घेऊन खर्च करावा लागत आहे, हा थोडा चिंतेचा विषय आहे.*

*आता जुन्या कार्यकर्त्यांचा वावर आणि उपलब्धता वयोपरत्वे कमी होत आहे. संस्कृत भाषा, मराठी साहित्य, ग्रंथ वाचन या विषयांत सक्रिय असलेले कार्यकर्ते जोडणे आवश्यक आहे. इंग्रजी माध्यमाचे आव्हान मोठे आहे. प्रस्तुत अहवालात प्रत्येक विभागाच्या कार्य / कार्याची माहिती आहे. करोना नंतर सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. विशेषतः गिरिमित्र विभागाने तडाखेबंद काम केल्याचे दिसते. मूलतः साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या आपल्या इतर कार्यांत त्यांनी उत्तमप्रकारे स्वतःला जोडून घेतले आहे. त्यातले तरूण कार्यकर्ते संस्थेच्या कार्यात सहभागी होत आहेत, ही उत्साहवर्धक गोष्ट आहे. दृष्टिसेवा केंद्राची कामगिरी अभिमानास्पद असतेच. बाकी अर्थ, आरोग्य, विज्ञान, सॅल्यूट इंडिया, संस्कृत, कला, मैत्रेयी, ग्रंथालय - हे सर्व विभाग - मुलुंड व ऐरोली या दोन्ही ठिकाणी उत्तम कामे करीत आहेत. विविधता, उत्तम गुणवत्ता, कल्पकता, उत्तम नियोजन, सातत्य, पारदर्शकता हे संस्थेचे गुणविशेष कायम राखले जात आहेत.*

*अधिकाधिक नागरिकांनी संस्थेशी स्वतःला जोडून घ्यावे आणि संस्थेसाठी वेळ आणि आर्थिक योगदान द्यावे असे आवाहन मी या निमित्ताने करतो.*

*धन्यवाद !*

*आपला,*
*चंद्रशेखर वझे, अध्यक्ष*

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**(स्थापना १९३७, नोंदणी : एफ् ४०२०)**

**विश्वस्त मंडळ**

| | |
|---|---|
| श्री. चंद्रशेखर ना. वझे | डॉ. आनंद रा. कट्टी |
| श्री.अजित ग. करंदीकर | श्री. उल्हास कृ. हंबर्डे |
| श्री. रमेश दे. धामणकर | श्री. किरण रा. देशमुख |

**कार्यकारी मंडळ**

**पदाधिकारी**

| | |
|---|---|
| श्री.चंद्रशेखर वझे (अध्यक्ष) | श्री. सतीश श्री. पाटणकर (उपाध्यक्ष) |
| श्री.जयप्रकाश र. बर्वे - कार्यवाह | श्री. अवधूत पं. गोळे - सहकार्यवाह |
| श्री. प्रकाश ह. सडेकर-कोषाध्यक्ष | श्री.धनंजय दि. दिवेकर- सहकोषाध्यक्ष |

**सदस्य**

| | |
|---|---|
| श्री.प्रदीप र. सप्रे | श्री.विनायक ज. जोगळेकर |
| श्री. विजय वा. वझे | श्री.विनोद म. सौदागर |
| श्री. शंकर गो. वीरकर | श्री.गुरूप्रसाद कार्लेकर |
| श्री. महेंद्र तेरेदेसाई | श्री. नितीन देशपांडे (स्वीकृत) |
| श्री. किशोर पेंढरकर (स्वीकृत) | श्रीमती नंदिनी हंबर्डे (स्वीकृत) |
| श्री. पंकज पाठक(स्वीकृत ) | श्री.मनोहर कोशे (स्वीकृत ०१.१२.२०२२पासून) |
| श्री. राहुल मेश्राम (स्वीकृत) | श्री. विजय वैद्य (निमंत्रित) |

**ऐरोली शाखा व्यवस्थापन समिती**

| | |
|---|---|
| श्री. प्रदीप र. सप्रे - अध्यक्ष | श्री.मनोहर कोशे (दि. ०१.१२.२०२२ पासून ) |
| श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह (दि.३०.१२.२०२२पर्यंत) | श्री. किशोर पेंढरकर -कोषाध्यक्ष |
| श्री.चंद्रशेखर वझे (पदसिद्ध) | श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध) |

**मानद अंतर्गत हिशेब तपासनीस**

श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी (मुलुंडसाठी), श्री. घनश्याम बा. कवठणकर(ऐरोलीसाठी)

**हिशेब तपासनीस**

मेसर्स सिंगवी, ओतुरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब : व्यवस्थापक — श्रीमती सुमिता पवार

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. श्रीरंग भाष्टे — श्री. भास्कर इंगळे

श्री. दिनेश रसाळ

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती श्रद्धा गोविलकर - ग्रंथपाल

श्रीमती आरती रणदिवे — श्री. योगेश मोडक

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती प्रियांका शाळीग्राम (व्यवस्थापक) — श्रीमती केतकी जाधव

श्रीमती वंदना शिंदे

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. सुरेंद्र राणे — श्री. प्रमोद चव्हाण

श्री. दीपक घाडगे.

---


**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**

म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०

दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६९ ०२२५

e-mail: mss_mulund@rediffmail.com

Web Site: www.mahasevasangh.org

**ऐरोली शाखा**

म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,

ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८

दूरध्वनी : ०२२-२७७९१८३७/ २७७९०८३६

e-mail : mss.airoli@rediffmail.com

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)

मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३) रविवार, दि. ०६ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ५.३० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

## सभेपुढील कामे

१. दि. ०७.०८.२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्त कायम करणे.
२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०२२-२३ सालच्या अहवालास मान्यता देणे.
३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०२२-२३ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.
४. २०२३-२४ सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.
५. २०२३-२४ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६. २०२३-२४ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.
७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.
८. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ३ सदस्यांच्या जागा भरणे.
९. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.
१०. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

## विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधीच्याच तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने सोमवार, दि. २५ जुलै ते मंगळवार, दि.०३ ऑगस्ट२०२३ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत कार्यालयांत पाहण्यास मिळतील.
३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या दि.०२ ऑगस्ट २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.
४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.
५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.
६. कार्यकारी मंडळातून सर्वश्री सतीश पाटणकर, धनंजय दिवेकर, विजय वा. वझे निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री प्रदीप नाटेकर, मधुसूदन बर्वे व श्रीमती सुमेधा नवाथे यांची निवडणूक समिती नियुक्त करण्यात आली आहे. श्री. प्रदीप नाटेकर निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. कार्यकारी मंडळातील ३ जागांसाठी निवडणूक रविवार, दि.०६ ऑगस्ट २०२३ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०२२ पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल.(सभासद क्र. आजीव ९८७ पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २४ जुलै २०२३ ते ०१ ऑगस्ट २०२३ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळतील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.०१ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे.
नामांकन पत्रांची छाननी दि. ०२ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ७.०० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ०३ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि.०३ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि.०४ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. १९ जुलै २०२३

जयप्रकाश बर्वे
(कार्यवाह)

**टीप :**

- सभासदांना अहवालाची मुद्रित प्रत घरी न पाठवता, अहवालाची पीडीएफ कॉपी संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय संस्थेच्या कार्यकारिणी ने घेतला आहे.
- या निर्णयानुसार सभासदांना अहवालाची पीडीएफ कॉपी संस्थेच्या mahasevasangh.org या संकेत स्थळावर दि.२२.०७.२०२३ पासून उपलब्ध होईल.
- ज्या सभासदांना अहवालाची मुद्रित प्रत हवी असेल, त्यांना ती दि.२३.०७.२०२३ पासून संस्थेच्या मुलुंड कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.
- वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी देखील अहवालाच्या मुद्रित प्रती सभेला उपस्थित राहाणाऱ्या सभासदांना उपलब्ध करून देण्यात येतील.
- सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.

**ऋणनिर्देश** : मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्रवाहिन्या, सर्व वार्ताहर, आय.डी.बी.आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; स्टेट बँक ऑफ इंडिया, अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, दृष्टिसेवा केंदासाठी काम करणारे कर्मचारी, शिक्षकवर्ग, मदतनीस तसेच 'नॅब' यांचे तसेच गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी, संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, श्री. सतीश कामत , श्री. राजाराम नाटेकर, वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कंपनी, मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी व श्री. घनश्याम बा. कवठणकर, 'महाराष्ट्र टाइम्स'चे श्री. पराग करंदीकर, श्री. विलास परुळेकर, श्री.समीर कर्वे, वैभव वझे, 'लोकसत्ता' चे श्री. विकास महाडिक, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालय व ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

जयप्रकाश बर्वे, कार्यवाह    चंद्रशेखर वझे ,अध्यक्ष

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | **एकूण सभा ➔** | **१** | **४** | **९** |
| १ | श्री. चं.ना.वझे (अध्यक्ष) | १ | ४ | ९ |
| २ | डॉ. श्री.आ.रा. कट्टी | १ | १ | - |
| ३ | श्री.र.दे. धामणकर | - | ३ | - |
| ४ | श्री.अ.ग. करंदीकर | १ | - | - |
| ५ | श्री. उ.कृ.हंबर्डे | १ | १ | - |
| ६ | श्री. कि.रा. देशमुख | १ | ४ | - |
| ७ | श्री.ज.र.बर्वे (कार्यवाह) | १ | ४ | ८ |
| ८ | श्री.ध.दि.दिवेकर | - | १ | ३ |
| ९ | श्री.वि.म. सौदागर | - | ३ | ७ |
| १० | श्री. प्र.र. सप्रे | - | २ | ६ |
| ११ | श्री.वि.ज.जोगळेकर | - | ४ | ६ |
| १२ | श्री.वि.वा.वझे | - | ४ | ५ |
| १३ | श्री.स.श्री.पाटणकर (उपाध्यक्ष) | १ (विशेष निमंत्रण) | ४ | ७ |
| १४ | श्री. अ.पं. गोळे | - | ४ | ९ |
| १५ | श्री.प्र.ह.सडेकर (कोषाध्यक्ष) | | ४ | ७ |
| १६ | श्री.शं.गो.वीरकर | - | ४ | ६ |
| १७ | श्री. नितीन देशपांडे | - | ४ | ६ |
| १८ | श्रीमती नंदिनी हंबर्डे | - | ४ | ८ |
| १९ | श्री.किशोर म. पेंढरकर | - | १ | २ |
| २० | महेंद्र तेरेदेसाई | - | ३ | ५ |
| २१ | गुरुप्रसाद कार्लेकर | - | ४ | ८ |
| २२ | पंकज पाठक | - | ० | १ |
| २३ | राहुल मेश्राम | - | ४ | ७ |
| २४ | विजय वैद्य | - | २ | ५ |
| २५ | मनोहर कोशे | - | ० | ३ |

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यांसाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे सभागृहाच्या भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च२२अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च २३ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | ९ | - | - | ९ |
| आधारस्तंभ | ७ | - | | ७ |
| आश्रयदाते | ५ | - | | ५ |
| पत्ता माहीत नसलेले | | - | | |
| आजीव | ९८७ | ७ | १ | ९९३ |
| **एकूण** | **१००८** | **७** | | **१०१४** |

**एकूण हरित सभासद - ६०८, अहवाल वर्षी हरित सभासद -२६५**

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम -

**मुलुंड वास्तू**

| **कार्यक्रम** | **सभागृह क्र.१व२** | **सभागृह क्र.१व२** | **सभागृह क्र.४** |
|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | १६पू | २४स<br>२३ सायं.<br>४५ संस्था कार्यक्रम | ३पू<br>२२स<br>१७ सायं<br>६९ संस्था |

**ऐरोली वास्तू -**

| **कार्यक्रम** | **सभागृह क्र.१ वातानुकूलित** | **सभागृह क्र.१ बिगर वातानुकूलित** | **तळमजला** |
|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ८ पू<br>१२स | २ पू<br>५ स | १० पू<br>१७ स |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार,

**श्रद्धांजली**

यंदाच्या अहवाल वर्षात संस्थेच्या आजीव सदस्य भानुमती केमकर (आजीव५९२) यांचे निधन झाले. तसेच ज्येष्ठ लेखक नंदू खरे, ज्येष्ठ अभिनेते प्रदीप पटवर्धन, शिवसंग्रामचे विनायक मेटे, शेअर बाजारातील गुंतवणूकदार राकेश झुनझुनवाला, ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ (द्वितीय), कॉमेडियन राजू श्रीवास्तव, संत साहित्याचे अभ्यासक भारूडकार डॉ.रामचंद्र देखणे, ज्येष्ठ अभिनेते सुनील शेंडे, ज्येष्ठ सिनेअभिनेत्री व मुलाखतकार तबस्सुम, ज्येष्ठ नाटक व सिने अभिनेते व सु.ल गद्रे कलाकार पुरस्कार सन्मानित विक्रम गोखले, लावणी सम्राज्ञी सुलोचनाबाई चव्हाण, ज्येष्ठ ध्वनिमुद्रिका संग्राहक भालचंद्र मेहेर, अभिनेत्या सुलोचना या सर्वांचे निधन झाले. या सर्व दिग्गजांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

## महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| | | |
| **गिरिमित्र विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | कोकुयो कॅम्लिन लि. | ५०,००० |
| २ | एन.एस. इलेक्ट्रिकिल्स | २०,००० |
| २ | श्रीमती वृंदा जाधव | १५,७४७ |
| ३ | स्टेपीन ॲडव्हेंचर | १५,००० |
| ४ | अलाईड सेफ्टी इक्विपमेंट्स प्रा.लि. | १५,००० |
| ५ | मुद्रा फाईन आर्टस् | १५,००० |
| ६ | वनराई गिरीराज ट्रेकर्स | ११,२५० |
| ७ | श्री.राकेश हर्डीकर | १०,४९८ |
| ८ | मायक्रो पॉवर टेक इंजिनिअरिंग | १०,००० |
| ९ | मॅनविन इंटरप्रायझेस | १०,००० |
| १० | श्री.जय गाडा | १०,००० |
| ११ | इतर देणग्या | ४,२५,२६० |
| | | |
| | **एकूण** | ६,०७,७५५ |
| **विविध पुरस्कारांसाठी तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सीमंतिनी काळे | २५,००० |
| २ | निखिल कम्फर्टस् | २१,००० |
| ३ | श्रीमती कल्पना श्रीनिवास कुलकर्णी | १०,००० |
| ४ | इतर देणग्या | ३,१४,३५० |
| | | |
| | **एकूण** | ३,७०,३५० |
| **ग्रंथालयासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | डॉ.सिंधू सदाशिव डांगे | ५०,००० |
| २ | डॉ.प्राजक्ता दांडेकर जैन | ३५,००० |
| ३ | श्री. सु.ना. पाटणकर (साहित्य साधना पुरस्कारासाठी) | ४०,००० |
| ४ | ज्ञानेश्वर पुस्तक पेढीसाठी | २,००० |
| ५ | इतर देणग्या | ५,००० |
| | | |
| | **एकूण** | १,३२,००० |
| | | |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| **सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कारासाठी** | | |
| | श्रीमती सुनीता मधुकर देवधर | ५०,००० |
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती पुष्पा जोशी | २५,००० |
| २ | श्रीमती लीला गोखले | २०,००० |
| ३ | श्री. प्रभाकर कराडकर | १५,००० |
| ४ | श्रीमती ममता शानबाग | ११,००० |
| ५ | श्रीमती सुचित्रा अनंत पाटील | १०,००० |
| ६ | श्री.प्रकाश सडेकर | १०,००० |
| ७ | श्री.विजय वामन वझे | १०,००० |
| ८ | श्रीमती मृणालिनी हरकारे | १०,००० |
| ९ | श्री.महेश नेने | १०,००० |
| १० | इतर देणग्या | ८५,११० |
| | | |
| | **एकूण** | २,०६,११० |

**संस्थेने दिलेल्या देणग्या**

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | सह्याद्री मानव सेवा मंच | १०,००० |
| २ | आचार्य अत्रे समिती | ५,००० |
| ३ | नववर्ष स्वागत यात्रा समिती | ५,००० |
| ४ | हम चॅरिटेबल ट्रस्ट | २,००० |




गिरिमित्र विभाग - किल्लेबांधणी स्पर्धा विजेते

## महाराष्ट्र सेवा संघाचे प्रमुख कार्यक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ३० एप्रिल २०२२ | सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार, पुरस्कारप्राप्त वैज्ञानिक संशोधक डॉ.प्राजक्ता दांडेकर जैन | संवादिका - रुचिरा सावंत<br>सूत्रसंचालिका - सीमा जोशी |
| २ | १५ ऑगस्ट २०२२ | भारतीय स्वातंत्र्य दिन - झेंडा वंदन | आयोजन : लक्ष्य फाऊंडेशन तर्फे मेरा देश मेरी पहचान, सादरकर्ते : किरण देशमुख |
| ३ | २४ ऑक्टोबर २०२२ | नादब्रह्म निर्मित दिवाळी पहाट २०२२<br>कार्यक्रम - नमन संगीत रंगभूमीला | निर्मिती,संकल्पना, आरेखन - मुकुंद मराठे, सहभागी कलाकार - मुकुंद मराठे, ज्ञानेश पेंढारकर, संपदा माने-कदम.<br>संवादिका - दिपाली केळकर<br>संगीत साथ - धनंजय पुराणिक, सुशील गद्रे, राजेंद्र भावे, अमित टाकळकर |
| ४ | १६ नोव्हेंबर २०२२ | सु.ल.गद्रे स्मृतिदिन<br>शब्दच्छल निर्मित - बेताल झालेत सूर | संगीत संयोजन - किशोर देशमुख, संवादक - श्री चंद्रशेखर वझे, डॉ.वृषाली देशमुख, कलाकार - नेहमीचे यशस्वी |
| ५ | १ जानेवारी २०२३ | म.से.संघ सामाजिक संस्था पुरस्कार<br><br>पुरस्कार प्राप्त सामाजिक संस्था - दीपस्तंभ फाऊंडेशन, जळगाव; संस्थापक - यजुर्वेंद्र महाजन, | प्रमुख पाहुणे - गौतम ठाकूर, (अध्यक्ष - सारस्वत सह.बँक) , मुलाखतकार माधुरी ताम्हाणे, सूत्रसंचालन - साधना जोशी |
| ६ | २९ जानेवारी २०२३ | सु.ल.गद्रे साहित्यिक पुरस्कार - पुरस्कारप्राप्त लेखक - डॉ.राजन गवस | प्रमुख पाहुणे - डॉ.रामदास भटकळ, संस्थापक,संचालक पॉप्युलर प्रकाशन<br>मुलाखतकार - प्रसाद कुमठेकर ,<br>सूत्रसंचालन : अनंत जोशी |
| ७ | २६ मार्च २०२३ | सु.ल.गद्रे कलाकार पुरस्कार - पुरस्कार प्राप्त कलाकार - कौशल इनामदार | प्रमुख पाहुणे - डॉ.विनय सहस्त्रबुद्धे, माजी खासदार, मुलाखतकार - अस्मिता पांडे, सूत्रसंचालन - श्रेयसी मंत्रवादी |







## संस्कृत विभाग

अध्यक्ष - प्रसाद गोडसे , कार्यवाह - सुमेधा नवाथे
सभासद : भावना दांडेकर, वरदा नवाथे, निधी कार्लेकर, प्रसाद भिडे, गुरूप्रसाद कार्लेकर

२० ऑगस्ट २०२२ रोजी सोमय्या महाविद्यालयात आयोजित केलेल्या नाट्यमहोत्सवात ६० व्या महाराष्ट्र राज्य संस्कृत राज्य नाट्य स्पर्धेत सादर केलेल्या तृतीय क्रमांक प्राप्त 'देवादपि गरीयसी' ह्या नाटकाचा प्रयोग सादर केला गेला.

महाराष्ट्र सेवा संघ आणि संस्कृत भारती यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत संस्कृत भाषा वर्ग २१ जुलै ते ७ ऑगस्ट२०२२ या कालावधीत आयोजित केले गेले. अवघ्या दहा दिवसांत हसत खेळत, पेन पेन्सिल शिवाय संस्कृत भाषा शिकण्याची उत्तम संधी उपलब्ध करून देण्यात आली.

या वर्षीचा स्व.अुद्धवराव त्रिविक्रम आठले संस्मरणार्थ 'संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार' - १३ नोव्हेंबर २०२२ रोजी परभणी येथील आचार्य अविनाश गोहाड आणि आय.आय.टी. रुरकी मधील डॉ.अनिल गौरी शेट्टी यांना प्रदान करण्यात आला. ह्याच दिवशी ६० व्या महाराष्ट्र राज्य संस्कृत राज्य नाट्य स्पर्धेत सादर केलेल्या तृतीय क्रमांक प्राप्त 'देवादपि गरीयसी' ह्या नाटकातील कलाकारांचा कौतुक समारंभ साजरा केला गेला.

२ फेब्रुवारी २०२३ रोजी ६१ व्या महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्य स्पर्धेत नाशिक येथे 'यमदूती' हे नाटक सादर करण्यात आले. या नाटकाचे लेखक पं. प्रभाकर भातखंडे यांना लेखनाचे द्वितीय व श्री. गुरूप्रसाद कार्लेकर यांना अभिनयाचे गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाले. संस्कृत रसास्वाद वर्ग - दि.१७ ऑगस्ट१९८५ पासून सुरू केलेला हा उपक्रम याही वर्षी जोमाने सुरू राहिला. त्यात ब्रह्मसूत्रांचा अभ्यास झाला. अहवाल वर्ष संपताना एकूण ३४० सूत्रांचा अभ्यास पूर्ण झाला आहे.

सुमेधा नवाथे , कार्यवाह — प्रसाद गोडसे ,अध्यक्ष

## आरोग्य विभाग

र. दे. धामणकर - अध्यक्ष, विनायक जोगळेकर - कार्यवाह
सदस्य : अ. मो. भंडारे, प्रकाश सडेकर, वि. म. सौदागर, डॉ.नितीन पाटणकर

आरोग्य विभागातर्फे २०२२-२३ या आर्थिक वर्षात आरोग्यविषयक कार्यक्रमांची शृंखला आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध विषयांतील तज्ज्ञ डॉक्टरांना आमंत्रित करण्यात आले. डॉ.नितीन पाटणकर यांनी मुलाखतीच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांशी संवाद साधला. आजार होऊ नये आणि आरोग्य उत्तम राहावे यासाठी घ्यायची काळजी तसेच एखादा गंभीर आजार झाल्यास कशा प्रकारे उपचार घेणे आवश्यक आहे, ही व अशा प्रकारची माहिती लोकांपर्यंत पोहोचावी हा या कार्यक्रमांचा उद्देश होता. या व्यतिरिक्त प्रत्येक कार्यक्रमाला जोडून एक आरोग्य शिबिर देखील आयोजित करण्यात आले होते.

**शनिवार, दि.०७.०५.२०२२** रोजी 'अस्थीठिसूळता - हाडे आणि इतर बरेच काही' हा विषय घेऊन पहिला कार्यक्रम आयोजित केला गेला. सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.स्नेहलदत्त मयेकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ.नितीन पाटणकर (मधुमेह तज्ज्ञ) यांनी त्यांच्याशी मुलाखतीच्या माध्यमातून संवाद साधला.

**शनिवार, दि.१८.०६.२०२२** रोजी 'पार्किनसन्स आणि अल्झायमर्स' या विषयावर कार्यक्रम आयोजित केला गेला. या आजारामध्ये 'केअर गिव्हर्स' ना खूप माहिती आणि आधाराची गरज असते. सुप्रसिद्ध न्युरॉलॉजिस्ट डॉ. योगेश गोडगे यांनी या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ.नितीन पाटणकर (मधुमेह तज्ज्ञ) यांनी त्यांच्याशी मुलाखतीच्या माध्यमातून संवाद साधला.

**मंगळवार, दि.२१ जून २०२२** रोजी म.से.संघ, मुलुंड व 'योगसंहिता' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त 'योगसाधना- प्रचार, प्रात्यक्षिके व फायदे' कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमात २५ साधकांनी भाग घेतला.

**रविवार, दि.०३.०७.२०२२** रोजी आरोग्य विभाग व फोर्टिस हॉस्पीटल (व्यवस्थापक - श्री.अविनाश वाघमारे) यांच्या संयुक्त विद्यमाने 'मोफत आरोग्य तपासणी शिबिर' घेण्यात आले. या शिबिरात रँडम ब्लड शुगर, रक्तदाब, उंची, बी.एम.आय., गरजेनुरूप डॉक्टरांचा सल्ला, ई.सी.जी., डोळ्यांची तपासणी, बोन डेन्सिटी इत्यादी चाचण्या घेण्यात आल्या. ३५ सभासदांनी याचा लाभ घेतला.

**शनिवार, दि.२७.०८.२०२२** रोजी 'मधुमेहाच्या औषधांची गरज संपविणारे उपचार' हा विषय घेऊन आरोग्य शृंखलेतील तिसरा कार्यक्रम तसेच शनिवार, दि.१५.१०.२०२२ रोजी संस्थेच्या ऐरोली शाखेत 'मधुमेहाच्या औषधांची गरज संपविणारे उपचार' हाच विषय घेऊन आरोग्य शृंखलेतील चौथा कार्यक्रम झाला. डॉ. नितीन पाटणकर यांनी या दोन्ही कार्यक्रमांत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**रविवार, दि.१२.०२.२०२३** रोजी म.से.संघ आणि पद्मश्री डॉ.विकास महात्मे यांच्या 'महात्मे हेल्थ ॲन्ड हॅपिनेस हॉस्पिटल' यांच्या संयुक्त विद्यमाने 'डोळे तपासणी शिबिर' संस्थेच्या वास्तूत आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात डोळ्यांची रचना, डोळ्यांचे विकार, डोळ्यांची निगा, दृष्टिदोषांची विविध कारणे तसेच डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू संबंधाने तपासणी, ग्लुकोमा तपासणी, मधुमेहींसाठी रेटिना तपासणी अद्ययावत् यंत्रांच्या साहाय्याने केली गेली. या सर्व तपासण्या सर्वांसाठी विनामूल्य होत्या. १२० व्यक्तींनी याचा लाभ घेतला.

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आणि बॉम्बे हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मॉडेल टाऊन येथे चालविण्यात येणाऱ्या दवाखान्यात चालविण्यात येणारे फिजिओथेरपी केंद्र दिवसेंदिवस अधिकाधीक लोकप्रिय होत असल्याचे दिसते. या वर्षी ५३०७ म्हणजे दरमहा सरासरी ४४२ रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला. इतर आजारांवरील औषधोपचारासाठी वर्षभरात दवाखान्याचा लाभ घेणाऱ्या रुग्णांची संख्या ३६७३ आहे. आसपासच्या परिसरातील लोकवस्ती डोळ्यासमोर ठेऊन येथील उपचार अत्यंत माफक व वाजवी दरात करण्यात येतात. महापालिकेच्या रुग्णालयातून जवळपासच्या परिसरातील क्षयरोगाने बाधित रुग्ण सोयीसाठी कालबद्ध उपचार सुविधेसाठी या दवाखान्यात पाठविण्याची परंपरा पाळली जात आहे.

विनायक जोगळेकर , कार्यवाह | र.दे धामणकर, अध्यक्ष

## आपुलकी

संपादक - चंद्रशेखर वझे, कार्यकारी संपादक - अरुण भंडारे, संपादन साहाय्य : विनोद सौदागर, नंदिनी हंबर्डे

या अहवालवर्षात आपुलकीचे दोन अंक प्रकाशित झाले. आपुलकीचे त्रैमासिकातून षण्मासिकात आपण रूपांतर केले आहे. आपुलकीच्या जानेवारी ते जून २०२२ च्या पहिल्या अंकातील महत्त्वाचा लेख म्हणजे किरण देशमुख यांचा , 'मेरा देश , मेरी पहचान' हा काश्मीरी तरुण तरुणी, तसेच शालेय विद्यार्थी यांना भारतातील प्रमुख राज्यांची ओळख व्हावी, त्यांची भाषा, संस्कृतीचा परिचय व्हावा म्हणून श्रीमती अनुराधा प्रभूदेसाई यांच्या 'लक्ष्य फाऊंडेशन'ने कुपवाडा आणि पुलवामा येथे सैन्य दलाच्या सहकार्याने आयोजित केलेले भव्य असे मेळावे. देशमुख यांचा या उपक्रमात मोलाचा सहभाग! पूर्वतयारीसाठी ते तीन चार वेळेला काश्मीरला जाऊन आले होते.

या अंकातील इतर लेख होते ग्रंथालयाने आयोजित केलेल्या वाचक मेळाव्यातील विजेत्या वाचकांचे पुस्तक परिचय लेख, याबरोबरच अरुण भंडारे आणि नंदिनी हंबर्डे यांनी अनुक्रमे करून दिलेले रवींद्र लाड यांच्या 'बखर घारापुरीची' आणि मेळघाटावरील मोहर या मृणालिनी चितळे यांच्या पुस्तकांचे परिचय.

जानेवारी ते जून२०२३ च्या दुसऱ्या अंकात ग्रंथालय आणि मैत्रेयी विभागांनी आयोजित केलेल्या 'मला काय वाटते' लेखन स्पर्धेतील विजेत्या वाचकांचे लेख. ग्रंथालयाचा तरुण वाचक मयूर नवले याचा 'रहस्यकथा'साहित्य प्रकारातील लेख विशेष वाचनीय. याबरोबरच आवर्जून उल्लेख करावा असा सचिन भुसारी यांचा 'झुक झुक झुक चली' हा रेल्वे प्रवासावरील खुमासदार लेख. याच अंकात संस्थेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी , ज्यांचे अनपेक्षित जाणे संस्थेच्या सर्व सदस्यांसाठी चटका लावून जाणारे होते. त्यांच्यासंबंधी त्यांची पत्नी, मुलगा आणि भाऊ यांचे भावस्पर्शी लेख आणि चंद्रशेखर कुलकर्णी यांचे निकटचे सहकारी, ऐरोली शाखेचे अध्यक्ष प्रदीप सप्रे यांचा चंद्रशेखर कुलकर्णी यांच्या दिलदार स्वभावाचा अनुभव सांगणारा लेख.

हे दोन्ही अंक देखणे होते. 'आपुलकी'चे फलित म्हणजे या मासिकाने महाराष्ट्र सेवा संघाशी जोडले गेलेल्या अनेकांना लिहिते केले.

...अरुण भंडारे,
कार्यकारी संपादक, आपुलकी

# मैत्रेयी- महिला विभाग

वीणा नाटेकर (अध्यक्ष), मेधा देव (कार्यवाह)
सदस्य : माधवी भुसारी, वासंती वैद्य, नंदिनी हंबर्डे, मीना वीरकर, अनुपमा देशपांडे, मृदुला सौदागर, शमी सडेकर

**दि.१२ एप्रिल २०२२ :** मैत्रेयी व कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड यांच्या संयुक्त विद्यमाने वासंतिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. 'लता वेलू गेला गगनावरी' गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या हिंदी व मराठी गाण्यांवर कार्यक्रम सादर करण्यात आला. सादरकर्त्या वीणा शुक्ल आणि सहकारी.

**शनिवार, दि.२ जुलै२०२२** : मैत्रेयी आणि सा.स.न.चिं.केळकर ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने कै.सुषमाताई पाटणकर यांच्या स्मृती प्रीत्यर्थ 'अनवट शांताबाई' हा स्व. शांताबाई शेळके यांच्या अनवट रचनांवर आधारित कार्यक्रम आयोजित केला गेला.
सादरकर्त्या - डॉ. वंदना बोकील कुलकर्णी आणि सहकारी.

मैत्रेयी आणि सा.स.न.चिं.केळकर ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने जुलै २०२२ मध्ये 'मला काय वाटतं ?' या लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राच्या विविध भागांतून अनेक स्पर्धकांनी आपले विचार मांडले. स्पर्धेचे विषय असे होते : १) बायोपिकचे पीक प्रभावशाली, प्रेरक की भ्रमनिरास ? , २) मराठी साहित्याला 'बुकर पुरस्कार' केव्हा ?, ३) विधवा परित्यक्ता यांच्या सामाजिक दर्जात सापेक्ष बदल होतोय का ?, ४) परदेशी खाद्य संस्कृतीचे वाढते आकर्षण/ आक्रमण, ५) रहस्यकथा साहित्य प्रकाराचे भवितव्य लुप्त होतंय कां ?, ६)धार्मिक वाद, मतभेद आपल्याला कुठे नेतील ?

स्पर्धेचे परीक्षक होते - श्रीमती माधुरी ताम्हाणे, श्री. सुहास जोशी, दि.२४ सप्टेंबर २०२२ ला पारितोषिक वितरण समारंभ झाला.
निकाल पुढीलप्रमाणे :
पहिले बक्षीस : छाया वेदपाठक, दुसरे बक्षीसः श्रद्धा वझे, तिसरे बक्षीस : मृणाल गालफाडे, उत्तेजनार्थ : रमेश सावंत.
या स्पर्धेच्या विजयी स्पर्धकांची रक्कम पुरस्कृत केली होती मान्यवर पत्रकार समीर कर्वे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी. कर्वे कुटुंबीयांचे विशेष आभार!

**मंगळवार, दि.९ ऑगस्ट२०२२** रोजी 'हम साथ साथ है।' काश्मीर खोऱ्यातील भारतीयत्वाला भारतीयांशी जोडण्यासाठी कार्यरत असलेल्या 'हम संस्था' या संस्थेची व तिच्या कार्याची माहिती देणारा कार्यक्रम आयोजित केला होता. सादरकर्त्या - प्रज्ञा गोखले.

**मंगळवार, दि.११ ऑक्टोबर २०२२** रोजी 'कोजागिरी'निमित्त भारतरत्न लता मंगेशकर यांच्या गाण्यावरील संगीताचा कार्यक्रम 'फुले वेचिता' आयोजित केला होता. सादरकर्त्या : अश्विनी करंदीकर आणि सुचित्रा चित्राव

**रविवार, दि.६ नोव्हेंबर २०२२** रोजी मैत्रेयी आणि सा.स.न.चिं.केळकर ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य विंदा करंदीकर यांच्या कवितांवर आधारित 'तसेच घुमते शुभ्र कबूतर' या कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सादरकर्त्या दिपाली दातार आणि सहकारी.

**मंगळवार, दि.६ डिसेंबर २०२२** रोजी 'स्वास्थ्य आपल्या केसांचे व त्वचेचे' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वक्त्या : केस व त्वचा तज्ज्ञ डॉ. श्रुती मांगलेकर.

**रविवार, दि.८ जानेवारी २०२३**: मैत्रेयी चे ३४ वे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते.
प्रथम सत्रात डॉ.सिंधूताई डांगे पुरस्कृत कै.सौ. प्रभावती पागे पुरस्कार सोहळा संपन्न झाला. पुरस्काराच्या मानकरी - मनिषा भोईर.
दुसऱ्या सत्रात 'मंतरलेले दिवस' - दूरदर्शनच्या आठवणींवर आधारित कार्यक्रम सादर झाला.

**मंगळवार, दि.७ फेब्रुवारी२०२३** : मैत्रेयी, सा.स.न.चिं.केळकर ग्रंथालय आणि 'मिळून साऱ्याजणी' यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र आयोजित केले गेले. सादरकर्त्या : श्रीमती गीताली वि.म. (संपादिका)

**शुक्रवार, दि.१० मार्च २०२३** रोजी 'रुळलेल्या वाटेवरची वेगळी वाट' या कार्यक्रमात डॉ.श्वेता दुधाट यांची मुलाखत आयोजित करण्यात आली होती. मुलाखतकार : डॉ.श्वेता जोग

याही वर्षी मैत्रेयी नेहमीप्रमाणेच दर्जेदार कार्यक्रम देण्याचा प्रयत्न करणार आहे. धन्यवाद!

मेधा देव ,कार्यवाह      वीणा नाटेकर,अध्यक्ष

# कला विभाग

अध्यक्ष - महेंद्र तेरेदेसाई, कार्यवाह : वैदेही फडणीस - फडके
सदस्य : मुग्धा गोळे, मोहित वैद्य, शशांक किणी, कविता नाईक

कोविड महामारीचे संकट दूर झाल्यावर पुन्हा एकदा नवीन जोशाने व उत्साहाने नवनवीन कार्यक्रम कला विभागातर्फे सादर करण्यात आले. या वर्षी सादर केल्या गेलेल्या कार्यक्रमांची यादी खालीलप्रमाणे :

**रविवार, दि.१०.०४.२०२२ :** दास्तान-ए-बड़ी बांका या नाटकातून धनश्री खंडकर आणि अक्षय शिंपी यांनी प्रत्येकाला वेगळ्या पण आपल्याशा भासणाऱ्या मुंबईचे दर्शन घडविले.

**शुक्रवार , दि.२२.०४.२०२२ ते रविवार २४.०४.२०२२** : समीर लिमये यांचे 'दासबोध' या ग्रंथावर आधारित 'कॉर्पोरेट कीर्तन' हे दासबोधाचे अर्थभेद, शब्दफोड, व सांप्रदायिक चाल यांचे मार्गदर्शन करणारे एक शिबिर घेण्यात आले.

**रविवार, दि.१५.०५.२०२२ :** भारतरत्न लता मंगेशकर यांनी गायलेल्या १९५० ते १९६८ या काळातील प्रथितयश नायिका मधुभाला, नूतन, वैजयंती माला यांसारख्या चिरतरुण नायिकांवर चित्रित झालेल्या अत्यंत श्रवणीय अशा अजरामर हिंदी चित्रपट गीतांचा व त्यांच्याशी संलग्न आठवणींचा दृक-श्राव्य कार्यक्रम, 'रहे ना रहे हम' हा कार्यक्रम सतीश जोशी यांनी सादर केला.

**शनिवार, दि.२१.०५.२०२२ :** समर्थांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन मांडणारा , प्रत्येक स्त्री व पुरूषाने जरूर पाहावा असा 'समर्थकालीन वुमन' हा कार्यक्रम समीर लिमये यांनी सादर केला.

**शुक्रवार, दि.२७.०५.२०२२ :** 'लक्ष्मणझुला थिएटर्स' निर्मित फ्रेंच लेखक जॉ झने यांच्या 'द मेड्स' वर आधारित 'काठपदर'या एकांकिकेचे आयोजन.

**शनिवार, २८.०५.२०२२ :** उत्तर भारतीय संगीतातील दहा थाटांवर आधारित बंदिशी, ध्रुपद, सरगम,तराना, ठुमरी, नाट्यसंगीत तसे भावगीते यांचा अनोखा नजराणा,'रंग जनक रागांचे' या कार्यक्रमातून अश्विनी गोखले यांनी सादर केला.

**रविवार, दि.१२.०६.२०२२ :** कै. सौ. सुविधा शंकर गोखले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'शास्त्रीय तसेच उपशास्त्रीय गायना'चा कार्यक्रम डॉ.रेवा नातू यांनी सादर केला.

**शुक्रवार, दि.१७.०६.२०२२ :** महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व विनय आपटे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'जीर्णोद्धार' आणि 'स्टार' या दोन पारितोषिक विजेत्या एकांकिकांचे सादरीकरण.

**शनिवार, दि.२५.०६.२०२२ :** महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आणि जी. एस.बी.सभा, मुलुंड यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध अभिनेते ऋषिकेश जोशी आणि प्रियदर्शन जाधव यांची प्रमुख भूमिका असलेले 'छुपे रुस्तम' हे नाटक सादर.

**शनिवार , दि. १६.०७.२०२२ :** अभिनेते डॉ.गिरीश ओक आणि डॉ.श्वेता पेंडसे यांच्या भूमिका असलेले नाटक '३८ कृष्ण व्हिला' हे नाटक सादर.

**रविवार, २८.०८.२०२२ :** पावसाची गाणी, पावसाच्या कविता आणि त्यानंतर भजीचा आस्वाद असा एक पावसावर आधारित 'पाऊस, कविता, गाणी आणि भजी' हा अभिजात मराठी कवितांचा काव्यवाचन आणि गायन मैफिलीचा आगळा कार्यक्रम संगीतकार मिलिंद जोशी आणि मनीषा जोशी यांनी सादर केला.

**शुक्रवार, दि.३०.०९.२०२२** रोजी 'रविवार डायरीज' या एकांकिकेचं सादरीकरण.

**रविवार, दि.१९.०३.२०२३ :** फ्रँका रामे यांच्या 'वुमन अलोन' चे सावित्री मेधातूल यांनी मराठी रूपांतरीत केलेले 'कडेकोट कडेलोट' हे नाटक प्रेक्षकांना अस्वस्थ करणारे आणि वेगळाच अनुभव देणारे ठरले.

**सोमवार, २७.०३.२०२३** रोजी सादर झालेले 'दशावतार राजकिरीट'या नाटकाने प्रक्षकांची मने जिंकली.

विविध विषयांवर आधारित चित्रपट आणि त्यानंतर त्यावर केलेली रंगतदार चर्चा यामुळे मागील वर्षी सुरू करण्यात आलेला 'सिनेमा ऑन बेंच' या कला विभागाच्या उपक्रमाला यावर्षी भरभरून प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात भाग घेणाऱ्यांची संख्या तब्बल ८६ च्या घरात पोहोचली असून पुढील वर्षीदेखील अशाच सभासद नोंदणीवाढीतून आणखी नवनवीन आणि विविध विषयांवर आधारित उपक्रम राबविण्याच्या दिशेने कला विभाग आपला प्रवास करीत आहे.

वैदेही फडणीस, कार्यवाह                    महेंद्र तेरेदेसाई,अध्यक्ष

# गिरिमित्र विभाग



अध्यक्ष : ह्रषीकेश यादव,  , कार्यवाह : किरण देशमुख
सभासद : ॲड. रवी परांजपे, राहुल मेश्राम, प्रसाद जोशी, रमेश कुलकर्णी व श्रीमती अपर्णा भट्टे

२०२२ - २३ या आर्थिक वर्षासाठी गिरिमित्र विभागाचा वार्षिक अहवाल सादर करताना विभाग समितीस आनंद होत आहे.

**'किल्ले पाहिलेला माणूस' माहितीपट प्रदर्शन :** अखिल महाराष्ट्र गिर्यारोहक महासंघाने निर्मिलेला आणि दुर्ग महर्षी गो.नी दांडेकर ह्यांच्या दुर्गप्रेमावर आधारित 'किल्ले पाहिलेला माणूस' ह्या माहितीपटाच्या महाराष्ट्रभर प्रदर्शनाचा मुहूर्त गुढीपाडव्याच्या दिवशी करण्यात आला. गिरिमित्र विभागातर्फेही ह्या उपक्रमास साथ देण्याच्या दृष्टीने ह्या माहितीपटाचे प्रदर्शन त्याच दिवशी, म्हणजेच दि.२ एप्रिल २०२२ रोजी सु.ल.गद्रे सभागृहात करण्यात आले. या प्रसंगी गो.नी.दांडेकर यांच्या मानसकन्या श्रीमती नंदा लोटलीकर यांनी गो.नींच्या आठवणींना उजाळा दिला. अनेक दुर्गप्रेमी आणि साहित्यप्रेमी मंडळींनी या कार्यक्रमात सहभागी होऊन चित्रपटाचा आस्वाद घेतला.

**गिरिमित्र संमेलन**

कोविडच्या साथीनंतर प्रथमच पार पडत असलेल्या १९व्या गिरिमित्र संमेलनासाठी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह नसता तरच नवल! साधारण जानेवारी २०२२ पासूनच संमेलनाच्या तयारीसाठी बैठका सुरू झाल्या. विविध विषयांवर चर्चा होऊन 'गिर्यारोहणातील स्थित्यंतरे' ही मध्यवर्ती संकल्पना या संमेलनासाठी निश्चित करण्यात आली. दि.९व१० जुलै २०२२ पार पडलेल्या या संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून माननीय ब्रिगेडियर अशोक ॲबे (निवृत्त) तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती उषःप्रभा पागे (ज्येष्ठ गिर्यारोहक) यांचे मार्गदर्शन लाभले. संमेलनाच्या आयोजनासाठी गिरिमित्र विभाग आणि संमेलन कार्यकर्ते यांसोबत 'वाय झेड ट्रेकर्स ' या संस्थेने आपले योगदान दिले. त्यांचेच मिलिंद जोशी यांनी संमेलन प्रमुखाची जबाबदारी स्वीकारली. नेहमीप्रमाणेच संमेलनात विविध फिल्म्सचे सादरीकरण झाले व परीक्षकांनी निकाल दिल्याप्रमाणे पारितोषिके प्रदान करण्यात आली. संमेलनादरम्यान छायाचित्र स्पर्धा, ब्लॉग स्पर्धा, अशा काही स्पर्धाही घेण्यात आल्या. या स्पर्धांसाठी विविध मान्यवरांनी परीक्षण केले व जाहीर केलेल्या निकालानुसार प्रथम पारितोषिक विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे.

फिल्म स्पर्धा : 'स्टेपिंग स्टोन - मायटी कोकणकडा' - सुमित ॲडव्हेंचर
छायाचित्र स्पर्धा - 'चंद्रताल लेक' - दीपेंद्र म्हात्रे
ट्रेकर ब्लॉग स्पर्धा - 'सुभेदार' - जयवंत कृष्णा जाधव , 'डोंगरभाऊ' - अमित सामंत
गिरिमित्र संमेलनाचा मानबिंदू असणारे विविध सन्मानही मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या सन्मानमूर्तींची नावे पुढीलप्रमाणे :
गिरिमित्र जीवनगौरव पुरस्कार : दिलीप झुंजारराव
गिरिमित्र जीवनगौरव पुरस्कार (मरणोत्तर) : कै.साबीर शेख
गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान : सर्वश्री श्रीधर वैशंपायन, हेमंत शेटे
गिरिमित्र गिरिभ्रमण संस्थात्मक कार्य सन्मान : सर्वश्री पराग लिमये, राहुल सोनावणे, विनोद पटेल, कै. दीपक राम (मरणोत्तर)
गिर्यारोहण क्षेत्रात अनेक संस्था चांगले योगदान देत असतात. अशा काही संस्थांचा यथोचित सन्मान संमेलनात करण्यात येतो. अशा संस्थांची नावे पुढीलप्रमाणे :
गिरिमित्र संस्था सन्मान : गिरिविराज हायकर्स, रत्नदुर्ग माऊंटेनिअर्स
गिरिमित्र शरद ओवळेकर सन्मान : रायगड परिवार (दुर्गसंवर्धनासाठी)

गिर्यारोहण क्षेत्राशी निगडित अनेक विषयांमध्ये गिर्यारोहक उत्साहाने विविध संशोधनात्मक कार्येही करत असतात. अशा व्यक्तींस व कार्यास उत्तेजन देण्याच्या हेतूने काही विशेष कार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्थांना आपले सादरीकरण लोकांपुढे मांडण्याची संधी देण्यात येते. या वर्षीही अशी सुमारे ६ अभ्यासपूर्ण सादरीकरणे प्रदर्शित करण्यात आली. सर्व श्रोत्यांचा त्यांस उत्तम प्रतिसाद तर मिळालाच आणि या प्रयत्नांमुळे सुदृढ व परिपक्व गिर्यारोहणाच्या दृष्टीने एक पाऊल पुढे पडले.

या वर्षीच्या संमेलनात एक नवा उपक्रम सुरू करण्यात आला आणि तो म्हणजे, सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये आणि पायथ्याच्या गावांत अनेक असे तरूण युवक गिर्यारोहकांना अडीअडचणींच्या प्रसंगात मदत करतात. तसेच दुर्दैवाने काही अपघात घडल्यास मदतीसाठी धावून येतात. अशा काही निवडक पाच गावकरी तरुणांचा मंचावर आमंत्रित करून सत्कार करण्यात आला व ते देत

असलेल्या योगदानाबद्दल कृतकृत्य भावना व्यक्त करण्यात आल्या.

या वर्षीच्या मध्यवर्ती संकल्पनेनुसार 'गिर्यारोहणातील स्थित्यंतरे' या विषयावर एक विशेष चित्रफीत संमेलन आयोजकांतर्फे सादर करण्यात आली. यामध्ये अनेक वर्षांपासून चालत आलेल्या गिर्यारोहण प्रकारांमध्ये कालानुरूप कसे बदल होत गेले, नवनवीन तंत्रज्ञानामुळे काय फायदे अथवा तोटे झाले तसेच यापुढील गिर्यारोहणामध्ये कोणत्या प्रकारची आव्हाने असतील असा एक सर्वसमावेशक सचित्र आढावा घेण्यात आला. प्रमुख वक्त्या श्रीमती उषःप्रभा पागे यांनीही या संदर्भात आपले विचार मांडले व गिर्यारोहण हा एक आव्हानात्मक खेळ असून यामध्ये स्पर्धा ही स्वतःची स्वतःशीच असावी व नाहक आपापसातील स्पर्धेला बळी न पडता सुरक्षित गिर्यारोहणाची कास धरावी असे सुचविले. प्रमुख पाहुणे मा. ब्रिगेडियर ॲबे (निवृत्त) यांनी हिमालयातील गिर्यारोहणावर आपले विचार मांडताना नुसती उंच शिखरे सर करण्यापेक्षा छोटी पण चढाईस कठीण अशी शिखरे निवडावीत व त्यात काही ना काही वेगळी आव्हाने यशस्वीपणे पेलली जावीत आणि अर्थातच त्यामध्ये कुठेही सुरक्षितता दुर्लक्षिली जाऊ नये असे सुचविले.

सुमारे ६०० च्या जवळपास प्रेक्षकांचा प्रतिसाद आणि स्टॉल्स, बॅनर, देणग्या इ. उत्पन्नांच्या स्त्रोतामुळे संमेलन आर्थिदृष्ट्याही यशस्वी झाले. विभागाच्या तसेच इतरही संस्थांच्या कार्यकर्त्यांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी उत्कृष्ट योगदान दिले.

**किल्ले बांधणी स्पर्धा :**

गिरिमित्र विभागातर्फे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही 'किल्ले बांधणी स्पर्धा २०२२' घेण्यात आली होती. त्यास मुलुंडसोबतच नाहुर, भांडुप, ठाणे, कळवा, कुर्ला व कोल्हापूर येथील स्पर्धकांनी भाग घेतला. एकूण ३२ स्पर्धकांच्या किल्ल्यांने परीक्षण श्री माधव फडके व श्री. राजन बागवे यांनी स्वतः भेट देऊन केले तर ठाणे, कळवा, कुर्ला व कोल्हापूर येथील किल्ल्यांचे परीक्षण अभिनव व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.

स्पर्धा २ गटांमध्ये घेण्यात आली होती. इयत्ता दहावी खालील विद्यार्थ्यांचे ज्युनिअर गट व दहावीच्या पुढील सिनियर किंवा खुला गट. किल्ला म्हणजे काय ?, किल्ल्यांचे प्रकार, त्यावर कोणत्या वास्तू असतात, किल्ल्यांचा भौगोलिक अभ्यास व ऐतिहासिक महत्त्व , किल्ल्याची प्रतिकृती करताना काय करावे व काय करू नये, किल्ला इकोफ्रेंडली कसा बनवावा, परीक्षणादरम्यात काय बघितले जाणार व गुण कसे दिले जाणार इत्यादींवर 'किल्ले बांधणी कार्यशाळा' सर्व स्पर्धकांसाठी घेण्यात आली होती.

किल्लेबांधणीमध्ये बऱ्याच सोसायट्यांमधील आबालवृद्ध सहभागी झाल्याचे चित्र होते. परीक्षणादरम्यान असे आढळून आले की दोन्ही गटांतील स्पर्धकांनी पुस्तके व गूगल सर्च च्या आधारे किल्ल्यांबाबत माहिती अभ्यासली होती. किल्ले परीक्षणाच्या वेळी बऱ्याच स्पर्धकांनी किल्ल्यांच्या माहितीसोबतच छत्रपती शिवाजी महाराज व मराठ्यांचा त्या किल्ल्यासंदर्भात असलेला इतिहास आवर्जून सांगितला. बऱ्याच स्पर्धकांनी काहीसे अनवट किल्ले निवडले होते. त्यामुळे निकाल निश्चित करणे परीक्षकांसाठी खूप कठीण झाले. स्पर्धकांनी बनवलेल्या किल्ल्यांच्या प्रतिकृती आणि दिलेल्या माहितीच्या निकषांवरून निकाल जाहीर करण्यात आले. त्यानुसार गट निहाय विजेते पुढीलप्रमाणे. ज्युनिअर गट (प्रथम क्रमांक) श्रद्धा सबुरी मंडळ, म्हाडा कॉलनी, मुलुंड(पूर्व) - सिंहगड किल्ला.

ज्युनिअर संमिश्र  गट (तृतीय क्रमांक - दीन दयाळ सोसायटी, छत्रपती संभाजी मैदानासमोर, मुलुंड (पूर्व) - राजगड किल्ला

ऑनलाईन गट - उत्तेजनार्थ - ॐ चिंतामणी ग्रुप, आई नगर, कळवा (पश्चिम) - तोरणा किल्ला

सिनियर गट - प्रथम क्रमांक (विभागून) - आझाद स्पोर्ट्स क्लब, केणी रोड, भांडुप (पूर्व) - देवगिरी किल्ला

आणि गवणीचा गोविंदा पथक, गवणीपाडा, सर्वोदय , मुलुंड (पश्चिम) - लोहगड किल्ला

स्पर्धेचे निकाल व पारितोषिक वितरण समारंभ महाराष्ट्र सेवा संघाच्या सु.ल.गद्रे सभागृहात शनिवार, दि.२९ ऑक्टोबर रोजी आयोजला गेला. निकाल जाणून घेण्यासाठी उत्सुक सुमारे १७५ लहान मोठे स्पर्धक, पालक आणि इतरही अनेक नागरिक कार्यक्रमासाठी उपस्थित होते.  इतिहास अभ्यासक श्री. अमित सामंत ह्यांनी जमलेल्या सर्वांना 'दगडांच्या देशा' ह्या नावाने सह्याद्रीची निर्मिती आणि त्याचा महाराष्ट्राच्या इतिहासावर वर पडलेला प्रभाव या विषयावर व्याख्यान दिले. उपस्थित मान्यवरांनी व परीक्षकांनी जमलेल्या स्पर्धकांचे मार्गदर्शन केले. शेवटी स्पर्धकांना आठवण म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा कोरलेली की-चेन भेट म्हणून देण्यात आली.

यंदा कोरोना काळानंतर २ वर्षांनी स्पर्धा होऊनसुद्धा सर्व स्पर्धकांची तयारी उत्तम होती. अशाप्रकारे गिरिमित्र विभागाने यावर्षी किल्ले बांधणी स्पर्धा घेऊन दिवाळीत किल्ले बांधणीची आपली संस्कृती जपणे आणि छत्रपती शिवाजी महाराज व मराठ्यांचा इतिहास मुलुंडकरांपर्यंत पोहोचविण्याचा एक छोटा पण यशस्वी प्रयत्न केला. या स्पर्धेसाठी राहुल मेश्राम यांनी अथक परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

किरण देशमुख, कार्यवाह | हृषीकेश यादव, अध्यक्ष

# महाराष्ट्र सेवा संघाचा उपक्रम - 'प्रेरणा पुरस्कार' व 'सॅल्यूट इंडिया'

समन्वयक - सतीश पाटणकर, नितीन देशपांडे

दि.१५ ऑगस्ट२०२२ रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने 'सॅल्यूट इंडिया' चे खंदे कार्यकर्ते आणि संस्थेचे विश्वस्त किरण देशमुख यांनी 'मेरा देश - मेरी पहचान' या 'लक्ष्य फाऊंडेशन'तर्फे राबविलेल्या उपक्रमाविषयी स्वतःच्या अनुभवांवर आधारित असे उत्तम सादरीकरण केले. काश्मीरमधील विद्यार्थीगणाला आपल्या भारत देशाशी मनाने जोडून घेण्याचा अतिशय नाविन्यपूर्ण प्रयत्न या उपक्रमात केला जातो. याद्वारे तेथील युवावर्गात राष्ट्रभावना फुलवणे व जोपासणे हा उद्देश साध्य करण्यासाठी केलेले दीर्घ प्रयत्न, आयोजनात येणाऱ्या समस्या, लष्कराची साथ, सादरीकरणाचा तपशील, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद यांबद्दल श्री.देशमुख भरभरून बोलले. 'सॅल्यूट इंडिया' तर्फे अशा प्रकारचा काही प्रयत्न करता येईल का ? या दृष्टीने या निमित्ताने विचार सुरू झाला.

**प्रेरणा पुरस्कार :**

सालाबादप्रमाणे (मात्र २ वर्षांच्या खंडानंतर) या वर्षी शनिवार, दि.७ जानेवारी २०२३ रोजी सॅल्यूट इंडिया तर्फे 'प्रेरणा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या वर्षीचे मानकरी होते कर्नल(निवृत्त) बिपीन शिंदे, ग्रुप कॅप्टन(निवृत्त) सुहास फाटक व सहायक पोलिस अधीक्षक(निवृत्त) श्री.जगदीश जाधव. या तिन्ही मान्यवरांना आपण मानपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित केले. मुलाखतकार होते 'लोकप्रभा'चे माजी संपादक श्री. विनायक परब. या मुलाखतीत मान्यवरांना त्यांच्या सेवा कालावधीतील अनुभवांबद्दल तसेच सेवानिवृत्तीनंतरच्या सामाजिक कार्यबद्दल, तसेच त्यांच्या व्यक्तिगत जीवन, कुटुंब यांविषयी नेमके प्रश्न विचारून श्री. परब यांनी बोलते केले. ही संयुक्त मुलाखत अतिशय सुंदर! या तिन्ही मान्यवरांचा सत्कार ले.ज. (निवृत्त) श्री.शैलेश तिनईकर यांच्या हस्ते केला गेला. तिनईकरसाहेबांनी श्रोत्यांची क्षमा मागून मराठी तसेच हिंदीतून संवाद साधला. त्यांच्या प्रदीर्घ देशसेवेतील अनुभव थोडक्यात सांगून आयोजकांचे व सत्कारमूर्तींचे भरभरून कौतुक केले.

श्री. बिपीन शिंदे हे तोफखान्यातील सेवेतून निवृत्त झाले. निवृत्तीनंतर ते आपल्या इतर निवृत्त सहकाऱ्यांना निवृत्तीवेतनाबद्दल मार्गदर्शन करतात.

श्री.सुहास फाटक हे भारतीय वायुदलात असताना त्यांनी वायुदलाच्या कर्मचाऱ्यांसाठी घरबांधणी प्रकल्प हाती घेतला व ती योजना अंमलात आणताना सरकारची मोठी आर्थिक बचत केली. त्यासाठी सरकारने त्यांना सेवा मेडल देऊन सन्मानित केले. श्री.फाटक हे निवृत्तीनंतर आपल्या इतर निवृत्त सहकाऱ्यांना निवृत्तीवेतनाबद्दल मार्गदर्शन करतात.

श्री.जगदीश जाधव हे आधी लष्करात होते (शॉर्ट सर्व्हिस कमिशन) आणि त्यानंतर ते 'महाराष्ट्र राज्य पोलिस' दलात सहाय्यक पोलिस अधीक्षक म्हणून कार्यरत झाले. त्यांचे निवृत्तीनंतरचे कार्य अफाट आहे. जी मुलं / मुली जन्मतःच अनाथ असतात, त्यांना अनाथाश्रमात आसरा मिळाला तरी ती सज्ञान झाल्यावर त्यांच्यासमोर उपजीविकेचा प्रश्न असतो. अशा मुलां/मुलींना संस्थेतून बाहेर पडल्यावर जगात कसं राहायचं व जगायचं हे त्यांच्या ट्रस्ट मध्ये शिकवतात. त्यांचे खूप विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्या विद्यार्थ्यांच्या शिस्तीने सर्व उपस्थित प्रेक्षक अचंबित झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला या सर्व मान्यवरांचे स्वागत व मानवंदना 'राष्ट्र छात्र सेना' च्या विद्यार्थ्यांनी बँड व स्लो मार्च करून दिली. त्यासाठी सरस्वती मराठी माध्यम शाळा- ठाणे, सिद्धार्थ महाविद्यालय, जयहिंद महाविद्यालय, जोशी-बेडेकर महाविद्यालय ह्यांनी आवर्जून आपले छात्र पाठवले होते. ही एक आगळीवेगळी, भव्य व नेत्रदीपक अशी मानवंदना होती. श्री.राहुल येल्लापुरकर यांच्या चित्रांचे प्रदर्शन हे देखील विशेष आकर्षण सभागृहात होते. कार्यक्रम रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे यशस्वी झाला.

समन्वयक - सतीश पाटणकर, नितीन देशपांडे



# अर्थ विभाग

विजय वझे ,(अध्यक्ष) सी.ए.अमिता ठोसर,( कार्यवाह)

सदस्य : प्रकाश सडेकर, तृप्ती राणे, ॲड.श्रेया देशपांडे, अरुण भंडारे, विजय वैद्य, विनय देसाई, विवेक दांडेकर, नितीन ढवळीकर, सी.ए. संजीव गोखले, सुरेंद्र तारे

| अनु.क्र | दिनांक | विषय | वक्ता | पुष्प |
|---|---|---|---|---|
| १ | २२.०४.२०२२ | होल्डिंग आणि इन्व्हेस्टमेंट कंपन्यांतील गुंतवणूक म्युच्युअल फंडांना पर्याय होऊ शकतो का? | डॉ.अभिजित फडणीस | ८४ |
| २ | १४.०५.२०२२ | शेअर मार्केटचं भवितव्य काय? | अरविंद चारी/जॉर्ज थॉमस | ८५ |
| ३ | १९.०६.२०२२ | सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसंबंधी कायद्याची तोंड ओळख!! | ॲड.मनीषा अभ्यंकर | ८६ |
| ४ | २६.०६.२०२२ | म्युच्युअल फंड गुंतवणूक - का आणि कशी? | चंद्रशेखर टिळक | ८७ |
| ५ | ०६.०८.२०२२ | इच्छापत्र | सी.ए. चंद्रशेखर वझे/ ॲड.श्रेया देशपांडे | ८८ |
| ६ | १०.०९.२०२२ | कर्जरोखे (बॉंड्स) बाजाराचे अबकड!! | श्री.दत्ता काळे. | ८९ |
| ७ | १६.१०.२०२२ | आजचा भारत उद्याची आशा | डॉ. सुनीती नागपूरकर | ९० |
| ८ | ०३.१२.२०२२ | शेअर मार्केटमध्ये यशस्वी ट्रेडर्स कसे होता येईल? | श्री. गिरीश प्रभू | ९१ |
| ९ | ०८.०१.२०२३ | निश्चित उत्पन्नाच्या (फिक्स्ड इन्कम) संधी | श्री.भरत फाटक | ९२ |
| १० | ०४.०२.२०२३ | गुंतवणुकीचा गुरूमंत्र - अर्थ संकल्पाच्या पलीकडे. परिसंवाद | डॉ.उदय निरगुडकर / चंद्रशेखर टिळक/ निखिल नाईक/ सी.ए.संजीव गोखले | ९३ |
| ११ | ११.०३.२०२३ | मालमत्ता वाटप आणि करनियोजन | श्री.निलेश शेट्टी/ श्री. क्रिस्ती मथई | ९४ |

या कार्यक्रमांव्यतिरिक्त तीन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ३०.०४.२०२२ व ०१.०५.२०२२ | चला होऊया शेअर बाजारावर स्वार - शेअर संबंधित सर्व महत्त्वाच्या विषयांवर कार्यशाळा | डॉ. अभिजित फडणीस |
| २ | १४.०१.२०२३ व १५.०१.२०२३ | A Full Trading Package for Intra-day and Short Term Trading | सर्वश्री गिरीश प्रभू, विजय वैद्य |
| ३ | २५.०२.२०२३ | कार्यशाळा - म्युच्युअल फंड गुंतवणूक | श्रीमती प्रीती झेंडे |

सी.ए. अमिता ठोसर, कार्यवाह

विजय वझे, अध्यक्ष

# साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

अध्यक्ष - नंदिनी हंबर्डे, कार्यवाह - अरुण भंडारे
सभासद - विनोद सौदागर, सदाशिव पोतदार, मेधा देव, अनंत जोशी, अर्चना कामत, पूनम भाटे

पुस्तके /ग्रंथ आपल्या वाचकांना हव्या त्या विश्वाची सफर आपले सोबती, साथी, मार्गदर्शक बनून घडवून आणतात. वाचकांचे बोट धरून कांही वेळा गूढ स्थळीदेखील घेऊन जातात. ग्रंथप्रेमी वाचकांचा श्वास म्हणजे पुस्तक वाचन. तर वाचकांना हव्या त्या विश्वाची सफर घडवून आणणारी जवळ जवळ ३५ हजार पुस्तके केळकर ग्रंथालयात आहेत. करोना साथीमुळे स्तब्ध झालेली वाचकांची पावले आता परत ग्रंथालयाकडे वळू लागली आहेत. आपल्या वाचकांना केवळ पुस्तकेच नव्हे तर काही चांगली व्याख्याने, इतर कार्यक्रम देणे हे देखील वाचनालयाचे एक कर्तव्य! या अहवालवर्षात असे ११ कार्यक्रम संस्था आणि ग्रंथालयाच्या सभासदांसाठी सादर केले गेले.

**दि.६ जून २०२२ :** शिवराज्याभिषेक दिन समस्त मराठी नव्हे तर तमाम भारतीयांनी आपल्या मनी कोरून ठेवावा असा दिवस. चारही पातशाह्या पालथ्या घालून महाराज विधिवत सिंहासनी विराजमान झाले तो हा दिवस. या दिवसाचे औचित्य साधत आम्ही गणेश धालपे या शिवभक्ताचे 'आग्ऱ्याहून सुटका ते राज्याभिषेक सोहळा' या विषयावर व्याख्यान ठेवले होते. श्रोत्यांचा प्रतिसाद उत्तम होता.

**दि.२ जुलै २०२२** : 'अनवट शांताबाई' हा कार्यक्रम सादर केला डॉ.वंदना बोकील कुलकर्णी आणि सहकारी. सुप्रसिद्ध गीतकार, कवयित्री शांता शेळके यांच्या अनवट रचनांवर हा कार्यक्रम होता.

**दि.३० जुलै२०२२** : 'एक संध्याकाळ कवितेची' , सादरकर्ते साहेबराव ठाणगे, रविकिरण पराडकर, विजय जोशी आणि अनंत जोशी.

**दि.१० ऑगस्ट२०२२** : 'वाचनवाटा - पुस्तक संवादाच्या' - सहभाग किशोर कदम, नितीन रिंढे आणि निखिलेश चित्रे. पुस्तकांविषयीची पुस्तके, पुस्तक संग्राहक, त्यांचे किस्से या संदर्भात एक सुंदर संवाद झाला.

**दि.१६ ते १८ सप्टेंबर २०२२** : कै. लक्ष्मणराव महाबळ पितृस्मृती व्याख्यानमाला. वक्ते होते कौस्तुभ कस्तुरे. त्यांचा विषय होता 'पेशवे पहिले बाजीराव व त्यांचे सहकारी सरदार शिंदे - होळकर'. तिन्ही दिवस चांगली उपस्थिती होती. व्याख्याने माहितीपूर्ण होती.

**दि.१४ आक्टोबर २०२२** : सेतुमाधवराव पगडी स्मृती व्याख्यानमाला - व्याख्यानाचा विषय होता 'फारसी भाषा साहित्य, काव्य व इतिहासाची साधने' वक्ते होते निखिल परांजपे. श्री. परांजपे हे पर्शियन भाषेचे व्याख्याते म्हणून सावित्रीबाई फुले विद्यापीठात तसेच डेक्कन महाविद्यालयात कार्यरत. व्यवसायाने सॉफ्टवेअर इंजिनिअर.

**दि.८ व ९ ऑक्टोबर २०२२** : ग्रंथालय व पॉप्युलर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रिय रसिक' साहित्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ८ ऑक्टोबरला अरुण म्हात्रे, मुग्धा गोडबोले, उत्तरा मोने आणि रामदास भटकळ यांनी जी.ए. कुलकर्णी आणि सदानंद रेगे यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या साहित्याचे अभिवाचन केले. ९ तारखेला 'कर्करोग माहिती आणि अनुभव' या पुस्तकाच्या लेखिका सुलोचना गवांदे यांच्याशी जान्हवी गांगल यांनी संवाद साधला.

**दि.१२डिसेंबर २०२२ :** सा.स.न.चिं केळकर ग्रंथालय आणि 'कथा कथन' यांच्या संयुक्त विद्यमाने जी.ए.कुलकर्णी आणि गौरी देशपांडे यांच्या कथांचं अभिवाचन ('कथा आदम-इव्हच्या') कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अमेय बोरकर, सचिन भुसारी, वृंदा दाभोळकर, माधवी गणपुले यांनी अभिवाचन केले.

**दि.७ फेब्रुवारी २०२३** : 'मिळून साऱ्याजणी' केळकर ग्रंथालय आणि मैत्रेयी विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. 'मिळून साऱ्याजणी' मसिकाच्या संपादिका गीताली वि.म. यांनी चर्चासत्रात वाचकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा परामर्ष घेतला.

**दि.११ फेब्रुवारी २०२३** : 'साहित्य साधना पुरस्कार'. संस्थेचे माजी अध्यक्ष, विश्वस्त श्री. सु.ना. पाटणकर यांच्या आर्थिक योगदानातून हा पुरस्कार प्रतिवर्षी दिला जातो. या वर्षी पुरस्काराचा विषय होता 'बुक्स ऑन बुक्स'. या प्रकारातील 'पुस्तकनाद' या जयप्रकाश सावंत व 'लीळा पुस्तकांच्या' या नितीन रिंढे यांच्या पुस्तकांना हा पुरस्कार देण्यात आला. बदलापूरच्या 'ग्रंथसखा'चे श्याम जोशी अध्यक्षस्थानी होते.

**दि.२७ फेब्रुवारी २०२३** : 'उत्स्फूर्त' प्रस्तुत 'प्रवासी पु.ल.' हा अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. माधव चिरमुले, अंजली कुलकर्णी आणि अमुल पंडित यांनी अभिवाचन केले. हा कार्यक्रम मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून आयोजित केला होता.

अरुण भंडारे,कार्यवाह

नंदिनी हंबर्डे , अध्यक्ष

## साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| ३२२ | १२९ | ४५१ |

३१-३-२०२३ रोजी उपलब्ध ग्रंथ - ३७,९३२

अहवाल वर्षात ८५,६८९/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील**

**३१-३-२०२३ अखेर सभासद**

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | ग्रंथ विभाग-सिटी ऑफ जॉय | |
|---|---|---|---|---|
| १५० | १०५ | ६९१ | ३३ | |
| अंक विभाग | सन्माननीय सदस्य | सिटी ऑफ जॉय -बाल | ग्रंथ अधिक मासिक | एकूण सदस्य |
| १४२ | २ | ३ | १७ | **११४३** |

## ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील

| **प्रकार** | **मासिके** | **त्रैमासिके** | **पाक्षिके** | **साप्ताहिके** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | २२ | ९ | १ | १० | ४२ |
| हिंदी | ६ | - | २ | - | ८ |
| इंग्रजी | ७ | - | ७ | ६ | २० |
| एकूण | ३५ | ९ | १० | १६ | ७० |

## दिवाळी अंक योजना २०२२-२०२३

| | |
|---|---|
| सभासद संख्या | १०९ |
| अंकाचे प्रकार | ६१ |
| अंकांच्या एकूण प्रती | १३४ |
| खरेदी किंमत रुपये | ३०,०४७/- |
| इतर अंक (देणगीद्वारा) | १४ |

**मोफत वाचनालय - वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | १२ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत, सामना, पुढारी, प्रहार, नवाकाळ, सकाळ, मुंबई तरुण भारत, रत्नागिरी टाईम्स, पुण्यनगरी |
| इंग्रजी | ५ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, इकॉनॉमिक टाईम्स, हिंदुस्तान टाईम्स, फ्री प्रेस |

# विज्ञान विभाग (विज्ञान प्रेमींचा मंच)



विज्ञान

अध्यक्ष : सतीश पाटणकर, कार्यवाह : नितीन देशपांडे, विशेष सहभाग : गुरूप्रसाद कार्लेकर, विद्याधर जोशी
तरूण सदस्य : वैभव बुद्धदेव, अथर्व जोशी, जयश्री सोनावणे, वरदा नवाथे, मृणाल थोरात, चिन्मयी वझे, जाई कुलकर्णी, सचिन वझे, अर्चित गोखले, अनिरुद्ध शेवळे, आदित पाटणकर

शनिवार, दि.३डिसेंबर २०२२ रोजी 'मराठी विज्ञान परिषद' व आपल्या संस्थेच्या विज्ञान विभागातर्फे एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थी गट होता इ.५वी ते ७ वी. विद्यार्थ्यांच्या उत्तम प्रतिसादामुळे ही कार्यशाळा यशस्वी झाली. एकूण ५ शाळांनी भाग घेतला. या पाच शाळांतील एकूण १५०विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले होते.
मराठी विज्ञान परिषदेकडून काही प्रयोग दाखविले गेले. काही प्रयोग फक्त बघून त्यामागचे तत्त्व समजून घ्यायचे होते व काही प्रयोग हे स्वतः करावयाचे होते. (हे प्रयोग सशुल्क होते) काही प्रयोग जीवशास्त्राशी निगडित होते तर काही रसायनशास्त्राशी, तर काही भौतिकशास्त्रावर आधारित होते. विद्यार्थ्यांना सर्व प्रयोग आवडले व निवडक प्रयोग ते घरी जाऊन करणार होते किंवा त्यांची उजळणी करणार होते.

विज्ञान विभागाचा तरूण, उत्साही कार्यकर्ता आणि तळमळीचा हौशी खगोल अभ्यासक अर्चित गोखले ह्याने पुढाकार घेऊन 'आकाश मित्र मंडळ, कल्याण' या संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष श्री. हेमंत मोने यांच्या मार्गदर्शनाखाली केलेला 'हौशी खगोलशास्त्र कार्यशाळा' हा उपक्रम दि.६ नोव्हेंबर २०२२ ते दि.११ डिसेंबर २०२२ या दरम्यान दर रविवारी ३ तास अशा पद्धतीने घेण्यात आला. एका शनिवारी रात्री शहापूरजवळ शांत, रम्य ठिकाणी आकाशदर्शनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. या उपक्रमाला प्रतिसाद मात्र कमी मिळाला असला तरी या अभ्यासवर्गाचा दर्जा मात्र उत्कृष्ट होता. हा कार्यक्रम सशुल्क होता. या कार्यक्रमातून 'सूर नभांगणाचे' या कार्यक्रमाची तयारीही सुरू झाली.

पुढे शनिवार, दि.८ एप्रिल २०२३ रोजी खूप तयारीनंतर 'सूर नभांगणाचे' हा श्री.हेमंत मोने सर यांच्या संकल्पनेतून साकारलेला अभिनव सांगीतिक कार्यक्रम सादर झाला. खगोलीय गोष्टींशी निगडित अशा ललित साहित्याची आणि सुपरिचित गाण्यांची पेरणी करत महत्त्वाच्या खगोलीय संकल्पनांचा रसिकांना रंजक पद्धतीने परिचय करून देणे ही संकल्पना मोने सरांनी आपल्या ओघवत्या शैलीत अतिशय बहारदारपणे सादर केली. सौ. अमिता गोखले यांनी संपूर्ण सांगीतिक बाजू सांभाळतांना इतर स्थानिक कलाकारांच्या मदतीने कार्यक्रमाला शोभा आणली. हा कार्यक्रम अल्पोपाहारासहित सशुल्क होता आणि त्याला उदंड प्रतिसाद मिळाला.

नितीन देशपांडे , कार्यवाह

सतीश पाटणकर, अध्यक्ष





विज्ञान विभागातर्फे कार्यशाळा

## दृष्टिसेवा अभ्यासिका

अध्यक्ष - रश्मी अनगळ, कार्यवाह - नंदिनी हंबर्डे
सभासद - सुनीता देवधर, विनोद सौदागर, सदाशिव पोतदार, द.व.कुलकर्णी

मार्च - एप्रिल २०२२ मध्ये शालांत परीक्षेला २३ विद्यार्थी बसले होते व ते सर्वच्या सर्व यशस्वी झाले. तरी यांतील भारती यादव (७९.२टक्के), जयेश चंदनशिवे (७७.७०टक्के), निशा खरात (७२.८०टक्के) यांचे यश विशेष लक्षणीय! सर्व विद्यार्थ्यांनी प्रथम वर्गात उत्तीर्ण होऊन विभागाच्या प्रयत्नांना भरघोस यश मिळवून दिले.
आजारपणामुळे गणेश पाटील हा विद्यार्थी पुरवणी परीक्षेला बसून ४६ टक्के गुण मिळवून यशस्वी झाला. यशस्वी विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन तसेच त्यांच्यासाठी लेखनिकाचे काम केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.
मार्च २०२३ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेला दृष्टिसेवेतर्फे मराठी माध्यमाचे १० विद्यार्थी व हिंदी माध्यमाचे ३ विद्यार्थी बसले होते. २०२२-२३ या वर्षीसुद्धा दृष्टिसेवेचा १०० टक्के निकाल लागला असून मोमीन माज या विद्यार्थ्याने ८५टक्के गुण मिळविले.
पुढील वर्षांसाठी बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार दृष्टिसेवा सज्ज राहील.

धन्यवाद!

नंदिनी हंबर्डे , कार्यवाह — रश्मी अनगळ, अध्यक्ष

## ऐरोली शाखा

अध्यक्ष - प्रदीप र. सप्रे , कार्यवाह - मनोहर कोशे , कोषाध्यक्ष - किशोर म. पेंढरकर
**सदस्य :** चंद्रशेखर वझे (पदसिद्ध), जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध) , शंकर गो. वीरकर, मु. शं. बालंखे , विजय जगताप, आरती सप्रे, माधवी देशमुख, दक्षता झगडे, अनिल कुऱ्हेकर, पंकज पाठक, नवीन कुलकर्णी

या आर्थिक वर्षात ऐरोली शाखेने करोना महामारीमुळे आपली विस्कटलेली आर्थिक घडी सावरण्याचा प्रयत्न केला व त्यात बऱ्यापैकी यशदेखील येत आहे. संस्थेच्या बापूराव देवधर सभागृहाच्या आरक्षणात उत्साहवर्धक वाढ झाली. आर्थिक नियोजन करताना शाखेने कार्यक्रम सादर करताना शक्य तितकी बचत केली व यासाठी शाखेच्या सर्व सहकाऱ्यांचे खास आभार.

शाखेतर्फे प्रतिवर्षी आयोजित केला जाणारा गुणवंत विद्यार्थी व ज्येष्ठ शिक्षक सन्मान या वर्षी जरी करता आला नसला तरी पुढील वर्षीपासून पुन्हा सुरू करण्याचा शाखेचा मानस आहे. गुढीपाडव्याला प्रतिवर्षीप्रमाणे गुढी उभारली गेली. शाखेचा वर्धापनदिनाला तेव्हाचे कार्यवाह शंकर वीरकर यांच्या ‘चंदनचोर वीरप्पन, त्याचा उदय आणि अस्त’ या कथाकथनाने बहार आणली तर ‘दिवाळी पहाट’ हे कार्यक्रम नेहमीच्या उत्साहात साजरे झाले.या कार्यक्रमांना रसिकांचा प्रतिसादही उत्तम लाभला. २५ ऑक्टोबर २०२२ रोजी दिवाळी पहाटच्या कार्यक्रमात ‘हे बंध रेशमाचे’ - ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांच्या गीतांचा कार्यक्रम निनाद आजगावकर व त्यांचे सहकारी यांनी सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रश्मी आमडेकर यांनी केले. कोजागिरी पौर्णिमेला शाखेच्याच सभासदांच्यातील जे कलाकार आहेत त्यांनी आपली कला सादर केली. श्री.अच्युत महाराज सत्संग मंडळ , हावरे बिल्डर्स व ऐरोली शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. अंजनगाव,सुरती येथील प.पू.श्री.जितेंद्रनाथ महाराज यांच्या अमृततुल्य वाणीने भक्तगणांचे कान तृप्त झाले. वर्षाच्या शेवटच्या भागात एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले. या उपक्रमाला दरवर्षी चांगला प्रतिसाद मिळतो, तसा याही वर्षी मिळाला. अर्थसंकल्पावरील आपल्या संस्थेचे माजी विश्वस्त डॉ. अभिजित फडणीस यांचे व्याख्यान त्यांच्या विद्वत्तेचे यथार्थ दर्शन घडविणारे होते.

या वर्षी अभ्यासिका विभागाने पुढाकार घेऊन शाखेतर्फे वर्षातून दोन वेळा ग्राहक पेठेचे आयोजन केले होते. पहिल्या प्रयत्नात

३५ स्टॉल्स व दुसऱ्या प्रयत्नात २६ स्टॉल असा प्रतिसाद मिळाला व आर्थिक लाभ झाला.

गेली दोन वर्ष सभागृह बंद असल्यामुळे पुरेशी काळजी घेऊन देखील तसेच करोना काळानंतर सर्वच सेवांचे दर वाढल्याने देखभाल व दुरूस्तीचा खर्च वाढला आहे. सभागृहात जाण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या लिफ्टची मोठी दुरुस्ती करण्यात आली. मुख्य संस्थेने साह्य केल्यामुळे शाखेवर आर्थिक भार पडला नाही. सोबतच वातानुकूलन यंत्रांची दुरुस्ती व देखभाल यांचा खर्चदेखील बराच आला. शाखेचे केटरर्स मे.नाटेकर केटरर्स ॲन्ड डेकोरेटर्स यांचे कंत्राट पुढील ५ वर्षांसाठी वाढविण्यात आले. करोना काळात त्यांना झालेले आर्थिक नुकसान लक्षात घेऊन हे करण्यात आले. या सर्व वातावरणातही शाखेने बरी कामगिरी केली असे आम्हाला वाटते व ही कामगिरी अधिक सुधारेल अशी आशा आहे. ऑगस्टमध्येच श्री. वीरकर यांनी वैयक्तिक कारणांमुळे आपल्याला या पुढे कार्यवाहपदाची जबाबदारी घेता येणार नाही असे सांगितले होते. डिसेंबरमध्ये त्यांना पदमुक्त करण्यात आले व त्यांच्याजागी श्री. मनोहर कोशे यांची नेमणूक करण्यात आली. श्री. वीरकर यांनी ग्रंथालयाचे कार्यवाहपद स्वीकारले आहे.

ऐरोली शाखेला मुख्य संस्थेकडून नेहमीच सहकार्य मिळत असते तसे याही वर्षी मिळाले. त्यांचे मनापासून आभार. शाखेतील कर्मचारी वर्ग व कार्यकर्ते , नाटेकर केटरर्स ॲन्ड डेकोरेटर्स, गोविंदभाई झंवर तसेच सेवा पुरविणाऱ्या इतर कंत्राटदार यांचे आभार!

मनोहर कोशे , कार्यवाह — प्रदीप सप्रे, अध्यक्ष

## कला विभाग - ऐरोली शाखा



**अध्यक्ष -** पंकज पाठक, कार्यवाह - **मु. शं. बालंखे**
**सदस्य :** सुधीर बागाईतकर, माधवी देशमुख

करोना महामारीमुळे विस्कळीत झालेले जनजीवन व संस्थेची आर्थिक घडी २०२२ च्या उत्तरार्धात हळूहळू पूर्वपदावर येऊ लागली. त्यामुळे वर्ष २०२२ मध्ये इच्छा असूनही कार्यक्रमांचे आयोजन झाले नाही. नववर्ष २०२३ उजाडताच एकपात्री अभिनव स्पर्धेचे आयोजन केले व ही स्पर्धा दि. २१/०१/२०२३ रोजी उत्स्फूर्त वातावरणात पार पडली. यात सुमारे २५ स्पर्धकांनी भाग घेतला. या स्पर्धेला मेघना साने व संजय मोरे या प्रथितयश परीक्षकांचे उत्तम मार्गदर्शन लाभले. त्यांनीही स्पर्धकांचा सहभाग, अभिनय क्षमता व नेटके नियोजन याबद्दल वाखाणणी केली. विजेत्या ३ स्पर्धकांना रोख बक्षिसे, मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

देशाचा वार्षिक अर्थसंकल्प संसदेत मांडल्यावर त्यातील महत्त्वाच्या गोष्टी सर्वसामान्यांना नीट कळाव्या म्हणून दरवर्षी या विषयावर याख्यानाचे आयोजन केले जाते. यावर्षी दि.०२/०२/२०२३ रोजी डॉ.अभिजित फडणीस यांनी अर्थसंकल्पावर उत्तम मार्गदर्शन केले. श्रोतृवर्गाची उपस्थिती लक्षणीय होती. डॉ. फडणीस यांनी अतिशय सोप्या, सहज रसाळ वाणीने slides च्या माध्यमातून अगदी सहजपणे हा विषय उपस्थितांना समजावला. रसिकांनी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात या व्याख्यानाचा लाभ घेतला.

आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये संस्थेच्या आर्थिक परिस्थितीचा वेळोवेळी आढावा घेत अधिकाधिक दर्जेदार कार्यक्रमांचे नियोजन करण्याचा या कला विभागाचा मानस आहे.

धन्यवाद.....

मु. शं. बालंखे , कार्यवाह — पंकज पाठक, अध्यक्ष

# मैत्री

अध्यक्ष - माधवी देशमुख , कार्यवाह - दक्षता झगडे , सल्लागार - सुनीता देवधर
**सदस्य**- आराधना दाभोलकर, विजया गोखले, मंदा कदम

**दि.२३.०४.२०२२ :** चैत्र गौरी पूजन - चैत्र गौरी पूजनाच्या वेळी मुलींचे खेळ आयोजित करण्यात आले होते. यात सुमारे १६० महिलांनी भाग घेतला. या कार्यक्रमाला सौ. चौधरी मॅडम - मुख्याध्यापिका प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या.

**दि.२ मे ते ६ मे २०२२ :** संस्कार वर्ग – ८ ते १४ वयोगटातील मुलां-मुलींसाठी संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. एकूण ९७ मुलांनी यात भाग घेतला. या अंतर्गत टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविणे, जादूचे प्रयोग, कॅलिग्राफी, फन विथ कुकिंग इत्यादी विषय शिकविण्यात आले.

**दि.२५.०६.२०२२ :** शूटिंग शूटिंग - अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या ऐरोली शाखेच्या सहकार्याने बालनाट्य सादर करण्यात आले होते. या नाट्यप्रयोगाला मुले व त्यांचे पालक असा सुमारे ३५० चा प्रेक्षकवर्ग लाभला.

**दि.२३.०७.२०२२ :** नाचू कीर्तनाचे रंगी – या अंतर्गत सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. सोमनाथ महाराज भोसले यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. उपस्थित महिला भक्तिरसात न्हाऊन निघाल्या व त्यांनी सभागृहात रिंगण करून दिंडीचा अनुभव घेतला. कार्यक्रमाला १५० महिला उपस्थित होत्या.

**दि.२७.०८.२०२२ :** मोफत शारीरिक तपासणी - या अंतर्गत मार्गदर्शक छाया काकडे व अंबादास चाटूफले यांनी आरोग्यविषयक समस्यांच्या निराकरणासाठी उपयुक्त व्याख्यान सादर केले व ६६ स्त्री पुरुषांचे वैयक्तिक समुपदेशन करून त्यांना योग्य सल्ला दिला.

**दि.१७.१०.२०२२ :** झटपट गृहसजावट – सौ. वर्षा पवार यांनी फुलांची, दिव्यांची सजावट, तोरणे, वॉल हॅन्गिंग इत्यादींच्या १५/१६ पद्धती सादर केल्या. कार्यक्रमाला ५५ महिलांची उपस्थिती लाभली.

**दि.२६.०११.२०२२ :** दिवाळी अंकांचा फराळ - हा कार्यक्रम खूप यशस्वी झाला. विविध स्त्रियांनी वेगवेगळ्या दिवाळी अंकांतील वेगवेगळ्या साहित्य प्रकारांचे अभिवाचन केले. ४ पुरुषांनीदेखील सहभाग घेतला. कार्यक्रमाला ७० महिलांची उपस्थिती लाभली.

**दि.१३.१२.२०२२ :** मैत्री वर्धापनदिन - या कार्यक्रमासाठी यू ट्युबर मधुरा बाचल (शेफ) प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या. यातील पाककला स्पर्धेत ३५ महिला सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमासाठी रु.१००/- इतके शुल्क ठेवण्यात आले होते याशिवाय पाककला स्पर्धेत भाग घेण्यासाठी रु.५०/- ची प्रवेशिका ठेवण्यात आली होती. तसेच २ प्रायोजकांनी रुपये १०००/- मूल्याचे स्टॉल लावले होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मधुरा बाचल यांनी मैत्रीचे कार्य व हेतू समजून घेतल्यानंतर आपण कोणतेही मानधन स्वीकारणार नाही असे सांगितले तसेच प्रवासखर्चही घेतला नाही. कार्यक्रमाला १६५ महिला उपस्थित होत्या.

**दि.२८.०१.२०२३** : तीळगूळ समारंभ अत्यंत उत्साहात संपन्न झाला. नवी मुंबई महानगर पालिकेच्या वाहतूक सेवेतील वाहक तसेच चालक महिलांनी या कार्यक्रमाला आपली हजेरी लावली. त्यांच्या अनुभव कथनाने कार्यक्रमाला एक वेगळीच ऊर्जा मिळाली.

**दि.२६.०२.२०२३ :** मैत्रिणींची सहल - मैत्रीची सहल मोरबे धरण, एन.डी.स्टुडिओ व कर्जतचे जीवनविद्या विद्यापीठ, पंचेश्वर मंदिर व श्री स्वामी समर्थ मठ या ठिकाणी ाायोजित करण्यात आली होती. एकूण ५० मैत्रिणी या सहलीत सहभागी झाल्या होत्या. सहल सशुल्क होती.

**दि.२५.०३.२०२३ :** स्त्री शक्ती पुरस्कार - जागतिक महिला दिनानिमित्त 'स्त्री शक्ती पुरस्कार' सौ. ममता भोसले यांना प्रदान करण्यात आला. त्यांना गौरवपत्र व रु.१००१/- असे स्वरूप असलेला हा पुरस्कार श्रीमती प्रियंदा कोयंडे (मागील वर्षीच्या पुरस्कार सन्मानित) यांच्या हस्ते देण्यात आला. या कार्यक्रमात महिलांसाठी शिवकालीन खेळ ठेवण्यात आले होते. ६५ महिलांनी या खेळांचा मनमुराद आनंद लुटला.

मैत्री विभागाला ऐरोलीच्या कार्यकारी मंडळाचे सहकार्य कायमच मिळत आले आहे, तसे ते यंदाही मिळाले. त्यांचे धन्यवाद. मैत्री विभागातर्फे सर्व कर्मचारी वर्गाचे व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार. लोभ आहेच,तो वृद्धिंगत व्हावा. धन्यवाद!!

सौ.दक्षता झगडे, कार्यवाह          सौ.माधवी देशमुख, अध्यक्ष

# सुनीता म. देवधर ग्रंथालय

अध्यक्ष - विजय जगताप, कार्यवाह - शंकर गो. वीरकर
सभासद :- माधवी देशमुख, मुकुंद बालंखे

पुस्तक ही एक अद्‌भुत गोष्ट आहे.केवळ आजूबाजूच्याच नव्हे तर जगातील अनेक गोष्टींची माहिती आपल्याला पुस्तकांमधूनच कळत असते.पुस्तक वाचणं म्हणजे आपले जीवन अधिक समृध्द करणं.

वाचनाची माध्यमं अनेक असली तरी पुस्तक हे त्यातील सर्वात शाश्वत माध्यम आहे. दिवाळी अंक योजना, देणगीदाखल उपलब्ध झालेली पुस्तकं, पुस्तकखरेदी यांसारखे ग्रंथालयाचे उपक्रम व्यवस्थित सुरु असून यावर्षी जरी पुस्तक खरेदी कमी झालीअसली तरी वाचनवेड वाढावं आणि वाचकांच्या वाचनाचा परिघ विस्तारावा यासाठी पुढील वर्षी अधिक पुस्तकं खरेदी करुन विविध विषयांवरची पुस्तकं वाचकांना उपलब्ध करुन देण्याचा ग्रंथालयाचा प्रयत्न राहील.

ग्रंथालयामध्ये सदस्यत्व नोंदवलेले अनेक वाचक नियमितपणे ग्रंथालयात येत असले तरी काही वाचक हे केवळ नावापुरते सदस्य असून ग्रंथालयात पुस्तके बदलण्यासाठी येत नाहीत. ग्रंथालयाची सदस्य संख्या ही अधिक पारदर्शी व वस्तुनिष्ठ असावी या दृष्टिकोनातून गेल्या वर्षांपासून अशा अनियमित / निष्क्रिय सदस्यांचा शोध घेऊन अशा सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा उपक्रम वाचनालयाने सुरु केला आहे. यातून यावर्षीसुमारे ५० सदस्यांचे सदस्यत्व रदद् करण्यात आले. वाचक संख्या वाढावी यासाठी सदस्य नोंदणीच्या मोहिमेतून सदस्य नोंदणीसाठी एक निवेदन, विविध Whats app Groups च्या माध्यमांतून १२०० लोकांपर्यंत पोहोचवण्यात आले. यातून काही नवीन सदस्यांची नोंदणी झाली. ग्रंथालयामध्ये वापरण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीत असलेल्या त्रुटी, प्रणालीच्या मर्यादा ही अंमलात आणताना आपल्याकडून प्रारंभी झालेल्या काही चुका (दिवाळीअंक व मासिकांची झालेली नोंद ) यांचा या वर्षीच्या ग्रंथमोजणीत सखोल पाठपुरावा करण्यात आला.यातून प्रणालीतील अनेक संदिग्ध गोष्टी व त्यातून होणाऱ्या संभाव्य चुका टाळून ग्रंथसंख्या दुरुस्त करण्याचे काम या वर्षीच्या ग्रंथमोजणीतून आपण पूर्ण केले.

दर्जेदार पुस्तके, तत्परसेवा, वाचककेंद्री धोरण,पारदर्शक कारभार व सोयीची वेळ ही ग्रंथालयाची वैशिष्ट्ये असून उत्तम विचारांचा प्रसार करण्याचे काम ग्रंथालय करत असते. यासाठी व्यवस्थापन समिती ऐरोली शाखेचे अध्यक्ष श्री. सप्रे, कार्यवाह श्री.कोशे यांचे मार्गदर्शन व कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळत असते.
सर्वांचे मनापासून आभार...

शंकर गो. वीरकर ,कार्यवाह — विजय जगताप, अध्यक्ष

## ऐरोली ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| **वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी** | **वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ** | **एकूण** |
|---|---|---|
| २५ | ४८ | ७३ |

**३१-०३-२०२३ रोजी उपलब्ध ग्रंथ - ७४००**

अहवाल वर्षात ५,८२०/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील** ३१-३-२०२३ अखेर सभासद २५२

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | |
|---|---|---|---|
| --- | ३३ | १२३ | |
| ग्रंथ - अंक विभाग | दीर्घ मुदत सदस्य | अंक विभाग | एकूण |
| १२३ | — | --- | २५२ |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | २८ | ० | - | ४ | ३२ |
| हिंदी | १ | - | २ | - | ३ |
| इंग्रजी | २ | - | ६ | ४ | १२ |
| एकूण | ३१ | ० | ८ | ८ | ४७ |

**दिवाळी अंक योजना**

सभासद संख्या : ३६

अंकाच्या एकूण प्रती : ३९

खरेदी किंमत रुपये : ९,१४३ /-

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | १ | महाराष्ट्र टाईम्स, - |
| इंग्रजी | - | - |

## अभ्यासिका

अध्यक्ष -आरती सप्रे , कार्यवाह - पंकज पाठक

सभासद : मुकुंद शं. बालंखे , छाया देशमुख, अनिल कुऱ्हेकर

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अभ्यासिकेचा लाभ, १२ वी व त्यापुढील तसेच स्पर्धा परीक्षा, मेडिकल, अभियांत्रिकी तसेच पोलिसांसाठी पदोन्नती परीक्षा या शाखांतील विद्यार्थ्यांना घेता आला. या वर्षी दोन्ही सत्रे मिळून ३५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

दि.१९ ते २१ जून २०२२ या काळात जागतिक योग दिनानिमित्त 'उत्तम आरोग्यासाठी योग' या नावाचे योग शिबिर आयोजित करण्यात आले होते. डॉ.उमेश कपूर यांनी साधकांना मार्गदर्शन केले. या शिबिरासही उत्तम प्रतिसाद लाभला. साधारण ६५ साधकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

दिनांक १६ ते १८ सप्टेंबर २०२२ या काळात अभ्यासिकेने पुढाकार घेऊन शाखेतर्फे भव्य ग्राहकपेठेचे आयोजन करण्यात आले होते. ३१ स्टॉल धारकांनी आपले स्टॉल लावले होते. या ग्राहकपेठेला उदंड प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाला जी.पी. पारसिक जनता सह.बँक यांचे प्रायोजकत्व लाभले होते.

१५ ऑक्टोबर २०२२ रोजी अभ्यासिका विभागाने 'संस्कार भारती'च्या सहकार्याने रांगोळी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या सशुल्क शिबिराला २३ महिलांनी/ मुलींनी हजेरी लावली. या शिबिरासाठी संस्कार भारतीच्या ऐरोलीतील कार्यकर्त्या श्रीमती सुवर्णा वाणी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

संक्रांतीच्या सुमारास म्हणजे ६ ते ८ जानेवारी २०२३ या काळात सप्टेंबर २०२२ मधील ग्राहक पेठेचा प्रतिसाद बघून तसेच स्टॉल धारकांच्या आग्रहाला प्रतिसाद देऊन पुन्हा ग्राहक पेठेचे आयोजन करण्यात आले. याही ग्राहक पेठेला चांगला प्रतिसाद मिळाला. २५ स्टॉल्सचे आरक्षण झाले. या दोन्ही ग्राहक पेठांमुळे संस्थेला बऱ्यापैकी आर्थिक लाभ झाला.

**महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड, ऐरोली शाखेचे अभ्यासिकेचे पर्यवेक्षक, कर्मचारी वर्ग, दुरुस्ती व देखभाल समितीचे सहकार्य तसेच मुख्य समितीचे मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे अभ्यासिकेचे नियोजन आणि व्यवस्थापन उत्तम होऊ शकले.**

धन्यवाद!

पंकज पाठक , कार्यवाह

सौ. आरती सप्रे, अध्यक्ष

# विज्ञान विभाग - ऐरोली

ऐरोली विज्ञान विभाग

**अध्यक्ष : मु.शं.बालंखे, कार्यवाह : अनिल कुन्हेकर**

२०२२-२३ हे आर्थिक वर्ष करोना महामारीनंतर जनजीवन पूर्वपदावर येण्यास व त्या अनुषंगाने विज्ञान विभागाचे कामकाज पूर्ववत करण्याचा विज्ञान विभागाचा प्रयत्न होता. 'मराठी विज्ञान परिषद' या संस्थेच्या सहकार्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञान प्रयोग' दाखविण्याची चाचपणी केली. परंतु शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा व वेळेअभावी हा कार्यक्रम घेता आला नाही. येत्या आर्थिक वर्षात हा कार्यक्रम करण्याचा निश्चित प्रयत्न केला जाईल.

दरम्यान २१.०५.२०२२ रोजी 'कचरा व्यवस्थापन - काळाची गरज' या पर्यावरणासंबंधीच्या विषयावर श्री.विद्याधर वालावलकर यांचे व्याख्यान तसेच स्लाईड शो च्या माध्यमातून प्रात्यक्षिके असा कार्यक्रम सादर झाला. नवी मुंबई महानगर पालिकेचे अधिकारी देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमात उपस्थिती लक्षणीय होती.
येत्या वर्षातदेखील शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञानावर आधारित कार्यक्रम आयोजित करण्याचा आमचा मानस आहे.
धन्यवाद !

अनिल कुन्हेकर , कार्यवाह

मुकुंद बालंखे , अध्यक्ष





'मराठी विज्ञान परिषद' - 'विज्ञान प्रयोग'



मैत्री - दिवाळी अंकांचा फराळ



मैत्री वर्धापनदिन

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड तर्फे आजपर्यंत देण्यात आलेले सु.ल. गद्रे साहित्यिक, कलाकार तसेच महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार प्राप्तकर्ते खालीलप्रमाणे,

| वर्ष | साहित्यिक पुरस्कार | कलाकार पुरस्कार | शिक्षक / संस्था पुरस्कार |
|---|---|---|---|
| १९९४ | श्रीमती शांता शेळके | श्रीमती भक्ती बर्वे | सर्वश्री. वसंतराव आगाशे व हरेराम बोडस |
| १९९५ | श्री. शं.ना.नवरे | श्रीमती ललिता पवार | सर्वश्री. चंद्रकांत मापारी व कृ.ल.पटवर्धन |
| १९९६ | श्रीमती सरोजिनी वैद्य | श्री. यशवंत देव | श्री. सय्यद गुलाम दस्तगीर व श्रीमती रेणू दांडेकर |
| १९९७ | श्री. अनिल अवचट | श्रीमती सुचेता भिडे चापेकर | सर्वश्री. अनिल जोशी व भानसिंग पाटील |
| १९९८ | श्री. रत्नाकर मतकरी | श्री. बाबूराव सडवेलकर | श्री. अरुण जोशी व श्रीमती विजया वाड |
| १९९९ | श्रीमती मंगला गोडबोले | श्री. रामदास पाध्ये | श्री. रामकुमार सावंत व श्रीमती वर्षा सहस्त्रबुध्दे |
| २००० | श्रीमती आशा बगे | श्री. शि. द. फडणीस | सर्वश्री. वामन हेर्लेकर, कुलकर्णी व अरुण फाटक |
| २००१ | श्री. लक्ष्मण लोंढे | श्रीमती प्रभा अत्रे | श्री. न.ल. गाडगीळ व श्रीमती सुचेता पडळकर |
| २००२ | श्री. ह.मो. मराठे | श्रीमती प्रिया तेंडुलकर | सावरकर प्रतिष्ठान ,सांगली |
| २००३ | श्रीमती अरुणा ढेरे | श्री. भरत दाभोळकर | दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तांसगांव |
| २००४ | श्री. मारुती चित्तमपल्ली | श्रीमती स्मिता तळवलकर | राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा, पुणे |
| २००५ | श्री. अशोक जैन | श्री. अरविंद गजेंद्रगडकर | सर्वश्री श्री. बाळासाहेब माने व विठ्ठल माने |
| २००६ | श्रीमती प्रतिभा रानडे | श्री. नितीन देसाई | सर्वश्री. रमेश लोणारे व मनोहर नरांजे |
| २००७ | श्रीमती मीना प्रभू | श्री. मोहन जोशी | प्रबोधिनी ट्रस्ट, नाशिक |
| २००८ | श्रीमती उमा कुलकर्णी | श्री. अशोक पत्की | आविष्कार, रत्नागिरी |
| २००९ | श्री. जगदीश खेबूडकर | श्रीमती उषा मंगेशकर | वात्सल्य ट्रस्ट, मुंबई |
| २०१० | डॉ. जयंत नारळीकर | श्री. दिलीप प्रभावळकर | लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा |
| २०११ | श्री. ना.धों. महानोर | सौ. वीणा सहस्त्रबुद्धे | कुष्ठरोग निवारण समिती, नेरे, पनवेल. |
| २०१२ | डॉ. विजया राजाध्यक्ष | श्री. विक्रम गोखले | मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र - पुणे |
| २०१३ | प्रा. शेषराव मोरे | श्री. प्रशांत दामले | सह्याद्रि आदिवासी बहुविध सेवा संघ, देवबांध |
| २०१४ | श्री. निरंजन घाटे | श्री. उत्तम पाचारणे | हेल्पर्स ऑफ दी हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर |
| २०१५ | डॉ. प्रतिमा इंगोले | डॉ. मोहन आगाशे | स्नेहज्योती निवासी अंध विद्यालय, दापोली |
| २०१६ | डॉ.माधुरी शानभाग | सुहास जोशी | आधार मतिमंद मुलांची शाळा, मालेगाव |
| २०१७ | डॉ.तारा भावाळकर | अशोक सराफ | अमेय पालक संघटना, खोणी, डोंबिवली |
| २०१८ | श्री. मुकुंद टाकसाळे | आप्पा वढावकर | अहिल्या महिला मंडळ, पेण |
| २०१९ | श्री.सुबोध जावडेकर | शरद पोंक्षे | सावली चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई |
| २०२० | श्री.राजन खान | – | – |
| २०२३ | डॉ.राजन गवस | कौशल इनामदार | दीपस्तंभ फाऊंडेशन, जळगाव |

## पं. वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार

| वर्ष | पुरस्कारप्राप्त विद्वान | क्षेत्र |
|---|---|---|
| २०११ | श्री. देवदत्त गोविंद पाटील | अध्ययन व अध्यापन |
| २०१२ | डॉ. भाग्यलता पाटसकर | अध्ययन व अध्यापन |
| २०१३ | डॉ. मल्हार कुलकर्णी | अध्ययन व अध्यापन |
| २०१४ | श्री. गणेश्वर सांब दीक्षित | अध्ययन व अध्यापन |
| २०१५ | डॉ. मधुसूदन पेन्ना | अध्ययन व अध्यापन |
| २०१६ | डॉ. रवींद्र मुळे | अध्ययन व अध्यापन |
| २०१७ | डॉ. अंजली पर्वते | अध्ययन व अध्यापन |
| २०१८ | डॉ. प्रसाद जोशी | अध्ययन व अध्यापन |

**वैविध्यपूर्ण साहित्यकृतींना प्रोत्साहन मिळावे म्हणून 'साहित्य साधना' पुरस्कार न.चिं. केळकर ग्रंथालयाने १५-०४-२००६ पासून सुरू केला आहे.**

| वर्ष | पुरस्कारप्राप्त लेखक | साहित्यकृती |
|---|---|---|
| २००६ | श्री. भारत सासणे | शुभवर्तमान |
| २००७ | श्री. गिरीश प्रभुणे | पारधी |
| २००८ | डॉ. संजय ओक | अवनत होई माथा |
| २००९ | श्री. सुमेध वडावाला | मनश्री |
| २०१० | डॉ. संजय ढोले | प्रेमाचा रेणू |
| २०११ | श्री. गिरीश कुबेर | युद्ध जिवांचे |
| २०१२ | श्रीमती आशा आपराद | भोगिले जे दु:ख त्याला |
| २०१३ | डॉ. सदाशिव शिवदे | ज्वलज्ज्वलनतेजस संभाजी राजा |
| २०१४ | हेमंत देसाई | बॉम्बे टॉकीज |
| २०१५ | डॉ. इसादास भडके | गन गन भोवरी |
| २०१६ | बालिका ज्ञानदेव /रवींद्र कोरडे | मॅगझिनीतून सुटतेय गोळी /धुसर झालं नसतं गांव |
| २०१७ | श्री. दत्तात्रय व. कुलकर्णी | टेक्नॉलॉजी ऑल्वेज विन्स |
| २०१८ | श्री. अभिजित घोरपडे | गाथा पर्यावरणाची |
| २०१९ | श्री. रवि आमले | भारतीय गुप्तचर संस्थेची गूढगाथा |
| २०२० | श्री.पुरुषोत्तम बेर्डे | क्लोज एन्काऊंटर |
| २०२३ | जयप्रकाश सावंत | पुस्तकनाद |
| २०२३ | नितिन रिंढे | लीळा पुस्तकांच्या |

**विविध कलाक्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराचा सन्मान (एक कलाकार - एक संध्याकाळ)**

| वर्ष | कलाकाराचे नाव | क्षेत्र |
|---|---|---|
